# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १४ जुलै, २०२५ / आषाढ २३, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | उप मुख्यमंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री | |
| (३) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री | |
| (४) | अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री | |

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ६५**

-----------------------------------

### पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत

**(१) * ७४३९ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन कामाच्या नव्या निविदेमध्ये १५८ कोटी ४४ लाख रुपये इतके एकूण अंदाजपत्रक निर्धारित करण्यात आले असून, कामाचे स्वरूप, क्षेत्रफळ, व कामगारांची संख्या सारखीच असतानाही गतवर्षीच्या अंदाजपत्रकापेक्षा सरासरी ७० ते ८० लाखांनी हे अंदाजपत्रक अधिक असल्याने महानगरपालिकेचे सुमारे १० कोटीं रुपयांचे नुकसान होत असल्याची बाब माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदेच्या अटींनुसार ठेकेदाराने स्वतःची किंवा भाड्याची वाहने वापरून कचरा उचलणे अपेक्षित असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी वाहनांचे तपशील व क्रमांक जाणीवपूर्वक मागविलेले नसून काही ठिकाणी ५० कामगारांची आवश्यकता असताना २०० ते २५० कामगार दाखवून, कामगार कल्याण निधी, भविष्य निर्वाह निधी तसेच राज्य विमा योजना आदीचा गैरवापर करून विशिष्ट ठेकेदारांना फायदा होईल अशा प्रकारे अटी ठरविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिनांक २४ मार्च, २०२५ रोजी पाठविलेल्या पत्रात नवी मुंबई व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील निविदा प्रक्रियेचे देण्यात आलेले विश्लेषण, त्यातील निष्कर्ष व केंद्रीय दक्षता आयोगाच्या (CVC) मार्गदर्शक तत्त्वांचा नव्या निविदेत समाविष्ट करण्यात आलेला नसून काळया यादीतील कंपनीला निविदा मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित जबाबदार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर सदोष निविदा प्रक्रिया रद्द करुन फेरनिविदा मागविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

प्रस्तुत प्रकरणी मागविण्यात आलेल्या निविदा ५ ते ७ टक्के अधिक दराने प्राप्त झाल्या होत्या. तथापि, सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील महानगरपालिकेच्या भूखंडावर वारंवार होत असलेल्या अतिक्रमणाबाबत**

**(२) * ११२२६ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील श्रद्धानंद मार्गावरील अंतिम भूखंड क्र. २५६ या महानगरपालिकेच्या मालकीच्या असलेल्या भूखंडावर वारंवार अतिक्रमण करून कब्जा केला जात असून महानगरपालिका अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, उक्त ठिकाणी गेली काही वर्षे अनधिकृत गॅरेज व गोदाम बांधलेले असून भूखंडावर केलल्या अतिक्रमणाविरोधात सतत तक्रारी येऊनही महानगरपालिकेकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अतिक्रमणाविरोधात परिसरातील नागरिक मा.उच्च न्यायालयात गेल्यानंतर महानगरपालिकेने अतिक्रमण हटवले असता महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे सदर भूखंडावर अतिक्रमण केलेल्यांनी पुन्हा कब्जा केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित असणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंड क्र.२५६ वर अनधिकृतपणे शेड बांधल्याचे निदर्शनास आल्यावर महानगरपालिकेमार्फत दि.२४.०३.२०२५ रोजी त्यावर तोडण्याची कारवाई करण्यात आली.

तद्नंतर सदर भूखंडावर अनधिकृत पार्कीगचे अतिक्रमण झाल्याची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दि.०३.०६.२०२५ रोजी अनधिकृत पार्कीगचे अतिक्रमण हटविण्यात आले.

सद्य:स्थितीत सदर भूखंडावर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चाकण (जि.पुणे) नगर परिषद येथील पाणीपुरवठा प्रकल्पाबाबत**

**(३) * ११९५२ श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) चाकण (जि.पुणे) नगरपरिषदेत नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर होऊनही नगर परिषदेने जुन्या कराराअंतर्गत संबंधित ठेकेदाराकडून शहराच्या मुख्य रस्त्याचे पेव्हर ब्लॉक काढून टाकण्याचे काम करण्यात येत असल्याने नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन एकात्मिक पाणी योजना मंजूर केली असताना तसेच मुख्य रस्त्यावरील पाईपलाईनच्या कामाची मुदत संपुष्टात आली असल्याने जुना करार रद्द करणे आवश्यक असतांना सदर काम सूरु ठेवण्याची परवानगी ठेकेदारांना देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जूने काम ठेकेदारांनी निकृष्ट व नियोजन शून्य केले असणे, वेळेत काम पूर्ण न करणे आणि नंतर नवीन पाणी प्रकल्पांतर्गत पाणीपुरवठा लाईन आणि सांडपाणी व्यवस्थापन इत्यादी कामे प्रस्तावित असताना देयके सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी करून सदर काम करणारा ठेकेदार हा नगरपरिषद हद्दीतील कामे घेऊन ती उप ठेकेदाराला देत असल्याचे निदर्शनास आले असल्याने याबाबत चौकशी करून संबंधित अधिकारी व ठेकेदार यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर अंतर्गत प्रभाग क्रमांक ११, १२ व १८ मध्ये पाण्याची पाईपलाईन टाकण्याच्या कामांना जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक २४.०२.२०२४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली. सदर कामांचे कार्यादेश दिनांक १३.०३.२०२४ रोजी देण्यात आले. सदर कामांच्या करारनाम्यामधील अटी-शर्ती नुसार या कामाची मुदत दि.१२/०९/२०२४ पर्यंत होती. तथापि, सदर कामास नगरपरिषद ठराव क्र.२७८, दि.३१/०१/२०२५ अन्वये दि.३१/०३/२०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. परंतु ठेकेदाराने सदरचे काम वेळेत पूर्ण न केल्याने निविदा व करारनाम्यामधील अटी व शर्तीनुसार ठेकेदाराच्या देयकामधून विलंब दंड वसूल करण्याची तजवीज नगरपरिषद चाकण यांनी ठेवली आहे.

(३) होय, हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान राज्यस्तर अंतर्गत रु.१५९.१५ कोटी इतक्या रकमेच्या चाकण नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक ०१.०२.२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तसेच, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर अंतर्गत प्रभाग क्र.११, १२, १८ मधील मार्केट यार्ड पाण्याची टाकी ते महात्मा फुले चौक पर्यंत मुख्य व सब पाईप लाईन टाकणे या कामाच्या रू.५६,८७,४१५/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार धावते देयकान्वये रु.१८,५१,६९२/- इतकी रक्कम दि.०९/०५/२०२४ रोजी ठेकेदारास अदा करण्यात आलेली आहे.

तथापि,द्विरुक्ती टाळण्याकरीता जिल्हास्तरीय नगरोत्थान योजनेमधून काम सुरु असलेल्या ठिकाणी राज्यस्तरीय नगरोत्थान अभियानांतर्गतच्या पाणी पुरवठा योजनेमधून कुठलेही काम करण्यात येऊ नये, याबाबत पाणी पुरवठा योजनेचे ठेकेदार व योजनेचे प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार यांना मुख्याधिकारी तथा प्रशासक, चाकण नगरपरिषद यांच्या दि.१३/०५/२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. राज्यस्तर नगरोत्थान मंजूर पाणीपुरवठा योजनेमधून विषयांकित ठिकाणी पाईप लाईन टाकण्याच्या कामांचे कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

(४) उपलब्ध अभिलेखावरुन अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील महानगरपालिकेच्या कचराभूमीमुळे आजारात वाढ झाल्याबाबत

**(४) * १२४४५ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरातील महानगरपालिकेच्या कचराभूमीमुळे सिद्धार्थ सोसायटी, शिक्षक सोसायटी प्रवेशद्वार, पोटफाडी चौक, मौलाली चौक, तसेच कुंभार गल्ली येथील नागरिकांना दररोज दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कचराभूमिमुळे लहान मुले, तसेच वृध्दांनाही सकाळी फिरायला किंवा बाहेर पडणे कठीण झाले असल्याने नागरिकांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊन अनेक संसर्गजन्य आजारामंध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी कोणतीही शास्त्रशुध्द पद्धत वापरली जात नसून महानगरपालिकेकडे तक्रार करूनही याबाबत निर्णय घेण्यात आलेला नसून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडूनही कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) सोलापूर शहरातून संकलित करण्यात आलेल्या कचऱ्याची तुळजापूर रोड येथील कचरा डेपोमध्ये सोलापूर बायोएनर्जी कंपनी लि. यांच्याकडून शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येते. सोलापूर बायोएनर्जी प्लांट या ठिकाणी ३०० टन प्रतिदिवस इतक्या क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प कार्यरत आहे. प्राप्त कचऱ्यापैकी ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस तसेच खत निर्मिती केली जाते आणि सुका कचरा विलगीकरण करुन तो प्रक्रिया उद्योगाकडे पाठविला जातो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदूरबार) तालुक्यातील रस्त्यांच्या कामात झालेली अनियमितता

**(५) *११५०४ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदूरबार) तालुक्यातील शेकडो गावे, व पाडे येथे रस्ते बांधण्यात आले नाहीत, हे रस्त्यांपासून वंचित आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांना जोडणारे रस्त्यांचे जाळे तयार करण्यासाठी निधी उपलब्ध करून देऊन तात्काळ रस्त्याचे काम सुरू करण्यात यावे अशी मागणी वारंवार स्थानिक नागरिकांसह लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील अधिकारी आणि ठेकेदार यांनी संगनमत करुन मंजूर केलेल्या जागी रस्ता न करता दुसऱ्याच जागी रस्ते तयार करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची कामे मंजूर आहेत त्यापैकी तब्बल ३६ रस्त्यांच्या कामांना अद्यापपर्यंत सुरुवात केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित रस्त्यांची कामे तातडीने सुरु करण्याबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) पाच कामांकरिता वन विभागाची आवश्यक परवानगी प्राप्त करुन कामे लवकरच सुरु करण्यात येत आहेत. प्रगतीत असलेल्या पाच कामांमधील आवश्यक लांबीत वन विभागाची परवानगी प्राप्त करुन पुढील काम कार्यान्वित करण्यात येत आहे.

उर्वरीत २६ प्रगतीतील कामांच्या भौतिक प्रगतीवर अंशत: परिणाम झाला आहे. कामाच्या करारनाम्यातील तरतुदीनुसार संबंधीत कंत्राटदारावर कार्यवाही करुन विहित मुदतीत कामे पुर्ण करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेतील अधिकारी प्रभारी किंवा प्रतिनियुक्तीवरील असल्यामुळे गैरव्यवहाराचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(६) * १३१७८ श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेतील बहुतेक महत्त्वाच्या पदावरील अधिकारी प्रभारी किंवा प्रतिनियुक्तीवरील असल्यामुळे महानगरपालिकेचा कारभार मंदावला असून गैरव्यवहाराचे प्रमाण वाढल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ च्या जनगणनेनुसार जवळपास २५ लाख लोकसंख्या असलेल्या वसई-विरार महानगरपालिकेचा कारभार अधिकाऱ्यांकडे असल्यामुळे महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेवर उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(३) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे उपसंचालक श्री. रेड्डी यांच्या घरी ई.डी ने छापा टाकला असता जवळपास ३२ कोटीं रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला व त्यांना २५ लाख रुपयांची लाच घेताना पकडल्यामुळे आयुक्तानी त्यांना दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास सेवेतून निलंबित केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसई-विरार महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये शासकीय जमिनीवर अनेक बेकायदा बांधकामे सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वसई विरार महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरिकांना उत्तम सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व महानगरपालिकेतील वाढलेला गैरव्यवहार थांबविण्याबाबत संबंधित जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंशतः खरे आहे.

अंमलबजावणी संचालनालयाच्या दि.१५ मे, २०२५ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकात श्री.रेड्डी यांच्या निवासस्थानी रु. ८.६ कोटीची रोख रक्कम आणि रु.२३.२५ कोटींचे दागिने व सोने जप्त केले असल्याचे नमूद आहे.

(४) अंशतः खरे आहे.

महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. जमीन-०७/२०१३/प्र.क्र.३७४/ज-१ दि. १० ऑक्टोबर, २०१३ मधील मुद्दा क्र. ३ नुसार जी शासकीय जमीन ज्या विभागाच्या ताब्यात आहे त्या विभागाची अतिक्रमणास प्रतिबंध करण्याची जबाबदारी आहे व त्या त्या विभागाकडून वेळोवेळी समन्वयाने कार्यवाही करण्यात येते.

(५) श्री. रेड्डी यांच्या निवासस्थानी अंमलबजावणी संचालनालयाने टाकलेल्या छाप्याबाबतची कोणतीही अधिकृत माहिती वसई विरार शहर महानगरपालिकेस प्राप्त झालेली नाही. तथापि, याबाबत वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध झाल्याने शासनाची बदनामी झाली असल्याने श्री. रेड्डी यांना दि.१९ मे, २०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच, त्यांचे विरूद्ध विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, नगररचना विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या नगररचना विभागाच्या बाहेर बदल्या करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कांजुरमार्ग (मुंबई) येथील कचराभूमीतून दुर्गंधी पसरत असल्याबाबत

**(७) * ९२९७ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई (पूर्व) उपनगरातील कांजुरमार्ग येथील महानगरपालिकेच्या कचराभूमीमुळे दुर्गंधीचा त्रास कांजुरमार्ग, भांडूप व विक्रोळी मधील रहिवाशांना होत असल्याने त्रस्त रहिवाशांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई महानगरपालिका प्रशासन तसेच नगर विकास विभाग, पर्यावरण विभाग व प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे नोटीस वजा निवेदन देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर डपिंग ग्राउंड भर वस्तीत असल्याने कच-याच्या दुर्गंधीमुळे येथील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने तसेच सदर जमीन संरक्षित वनजमीन असल्याने राज्य शासनाने दिनांक २९ डिसेंबर, २००९ रोजी काढलेली अधिसूचना बेकायदेशीर ठरवून मा.उच्च न्यायालयाने सदर डपिंग ग्राऊंड बंद करण्याची व त्याला पर्यायी जागा बघण्याकरिता मुंबई महानगरपालिकेला तीन महिन्यांची मुदत दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत मुंबई महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळही या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करीत नसल्याचे स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमी यांनी निदर्शनास आणले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिकेकडून ठोस निर्णय अपेक्षित असतानाही कच-याच्या विल्हेवाटीसाठी कोणतीही शास्त्रोक्त पद्धत वापरली जात नसल्याने दुर्गंधी दिवसेदिवस वाढत असून परिसरातील नागरिकांमध्ये श्वसनाचे व पोटाचे विकार वाढले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून सदर कचराभूमी बंद करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

याबाबत नागरिकांकडून निवेदन प्राप्त झाले असून या प्रकल्पाच्या अनुषंगाने कन्नमवार को.ऑप.हौ.सो. असोसिएशन लि. आणि इतर तसेच वनशक्ती या अशासकीय संस्थेने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध याचिका दाखल केल्या असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) हे खरे नाही.

कांजूर येथे स्विकारण्यात येणाऱ्या कचऱ्यावर बायोरिॲक्टर तंत्रज्ञान व खत निर्मिती तंत्रज्ञान वापरून शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया केली जाते. तसेच, कचऱ्यावर दुर्गंधीनाशक द्रव्यांची फवारणी करण्यात येते.

सन २०२२ ते २०२४ मधील क्रांतीवीर महात्मा ज्योतीबा फुले रुग्णालय व कांजूर दवाखान्याच्या मागील ३ वर्षाच्या श्वसन, पोट विकार व इतर रुग्ण संख्येमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे आढळून आले नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उलवे (नवी मुंबई) येथील सिडकोच्या मालकीच्या गौण खनिजांची स्वराज्य स्टोन एलपी कंपनीने परस्पर विक्री केल्याबाबत

**(८) * ११७८८ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील उलवे येथे होत असलेल्या विमानतळाच्या कामाकरिता होणाऱ्या उत्खननातून निघणारा दगड, माती व मुरुम त्यासाठी लागणारे रॉयल्टी पासेस सिडकोच्या कोणत्याही परवानगी शिवाय स्वराज्य स्टोन एलपी कंपनीद्वारे विक्री केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामध्ये सिडकोच्या अधिकाऱ्यांचे संगनमताने शासनाची सुमारे २०० ते ३०० कोटी रुपयांची फसवणूक केली जात असल्यामुळे या प्रकरणी चौकशी करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २० मार्च,२०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या पुर्व विकास कामांमध्ये उलवा टेकडीचे उत्खनन व सपाटीकरण हे काम हाती घेण्यात आले होते. सदर कामासाठी सिडको महामंडळामार्फत विविध कंत्राटदारांची नेमणूक करण्यात आली होती. सद्यस्थितीत, मे. भारतीय इन्फ्रा प्रोजेक्ट लि. या कंत्राटदाराची कामे सुरु असून निविदेतील अटी व शर्तीनुसार उत्खनन केलेले गौण खनिज (दगड, माती, मुरुम इ.) चे स्वामित्वधन जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे भरणा केल्यानंतर त्याची विल्हेवाट संबंधित कंत्राटदार यांचेकडून केली जाते.

मे. स्वराज स्टोन एलपी या कंपनीला सिडकोकडून कोणतेही काम देण्यात आलेले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

सदर निवेदनावर मा.मुख्यमंत्री महोदयांनी व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांना ‘तपासून कार्यवाही करावी’ असे निर्देश दिले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील डोंगरी भागात फर्स्ट फ्लॅक रोड येथील एका इमारतीतील अनधिकृत मजल्याच्या बांधकामाबाबत

**(९)** * **८४२२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) फर्स्ट फ्लॅक रोड, डोंगरी (मुंबई) येथील एका १६ मजली इमारतीतील १२ मजले अनधिकृत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईत अनेक ठिकाणी अनधिकृत बांधकामे करण्यात येत असतानाही महानगरपालिकेकडून वेळेत कारवाई करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यानुसार अनधिकृत बांधकाम करणाऱ्या दोषी बांधकाम व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर इमारतीच्या ४ थ्या मजल्यावरील अनधिकृत आर.सी.सी.कॉलमच्या बांधकामास बृहन्मुंबई महानगरपालिकेने मनपा अधिनियम कलम ३५४ (अ) अन्वये दि.२०.०७.२०१९ रोजी नोटीस बजावण्यात आली होती. तद्नंतर कोव्हिड काळात नोटीस धारकाने सदर अनधिकृत बांधकाम पुनश्च सुरू केले. याप्रकरणी दि.१८.०८.२०२१ रोजी डोंगरी पोलीस स्थानकामध्ये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमाच्या कलम ५२ (४३) नुसार इमारतीच्या मालक/ताबेदार यांच्या विरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर अनधिकृत बांधकामावर एकूण ४६ वेळा निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे. विद्युत व जलजोडणी पुरवठा खंडीत करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत सदर इमारतीचे १६ ते १३ मजल्यापर्यंत आतील स्लॅब व भिंतीचे निष्कासन करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.
(३) सदर अनधिकृत बांधकामाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग व तेथील उड्डाणपुलाची दुरूस्ती करण्याबाबत**

**(१०) * १३७९३ श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गढी, (ता.गेवराई,जि.बीड) येथे सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ वर दिनांक २६ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास अपघात होऊन सहा तरुणांचा मृत्यु झाल्याने उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी याबाबतचा अहवाल दिनांक २७ मे, २०२५ रोजी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, बीड यांना सादर केला आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालात अपघात स्थळ असलेला उड्डाणपुल तांत्रिकदृष्ट्या चुकीचा असून सदर पुलावरील उथळ क्षेत्रात सतत पाणी साठल्याने याठिकाणी वारंवार अपघात होत असल्याची बाब निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी लोकप्रतिनिधी, गेवराई यांनी दिनांक २९ मे, २०२५ रोजी प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर व जिल्हाधिकारी, बीड यांना पत्र देऊन राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ वरील महामार्गाच्या दुरुस्तीची कामे करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन महामार्गाच्या दुरुस्तीसह उड्डाणपुलाचे काम सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे आहे.

सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ भारतीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारित येतो.

(२) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी दिनांक २७.५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड तथा अध्यक्ष जिल्हा बीड तथा अध्यक्ष रस्ता सुरक्षा समिती यांना सादर केलेल्या अहवालामध्ये सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील मौजे गढी येथील जयभवानी साखर कारखान्यासमोरील उड्डाणपूल तांत्रिकदृष्टया चुकीचा असून सदरच्या ठिकाणी उथळ क्षेत्रात पाऊस पडल्यानंतर नेहमी पाणी साठले जाते व त्याठिकाणी वारंवार लहानमोठे अपघात होत असल्याची बाब नमूद आहे. तथापि,प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक २४ जून २०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना सादर केलेल्या अहवालामध्ये अपघात स्थळावरील रस्ता चार पदरी असून रस्त्याची आखणी सरळ असल्याची बाब नमूद आहे.
(३) हे खरे आहे.
(४) राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ येडशी ते छत्रपती संभाजीनगर या महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सन २०२० मध्ये पूर्ण करण्यात आले असून महामार्गाचे काम IRC व MoRTH च्या मानकाप्रमाणे करण्यात आलेले आहे. अपघातस्थळी रस्त्याच्या आखणीमध्ये त्रुटी नाही. तथापि झालेल्या अपघातांची माहिती विचारात घेऊन आवश्यकतेनुसार सुधारणा करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परळ (मुंबई) येथील सर्व्हे क्र. ६६२ वरील पुनर्विकास प्रकल्पातील अनियमिततेबाबत

**(११) * ११६३९ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुंबईतील फ/दक्षिण परळ येथील सर्व्हे क्र. ६६२ वरील पुनर्विकास प्रकल्पातील रस्ता हस्तांतरणात मुंबई महानगरपालिकेच्या नियमानुसार विकासकाने हस्तांतरित भुभागावरील सर्व बांधकामास पर्यायी जागा देणे बंधनकारक असतानाही अतिक्रमित भुभाग महानगरपालिकेस कागदोपत्री हस्तांतरित केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात फसवणुक करून अतिक्रमित जागा महानगरपालिकेस हस्तांतरित करून त्याचा ताबा पावतीच्या आधारे प्रकल्पातील विक्री घटकाच्या इमारतीस संपुर्ण भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकरिता मुंबई महानगरपालिकेकडे अर्ज केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेस उपायुक्त परि-२ व ईमारत प्रस्ताव विभाग यांच्याकडे विकासकावर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) सदर इमारतीस वास्तुविशारदामार्फत दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावानुसार दि.१०.०१.२०२५ रोजी अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे. वास्तुविशारदाने प्रकल्पातील विक्री घटकाच्या इमारतीस संपूर्ण भोगवटा प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज केलेला नाही.

(३) हे खरे आहे.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या पत्राच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरापालिकेच्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काटोल ते वरुड (जि.नागपूर) मार्गावर पडलेल्या भेंगामुळे एका दुचाकीस्वाराचा झालेला अपघात

**(१२) * १३३२७ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यात काटोल- वरुड सिमेंट रस्ता सुमारे ३१४ कोटी २१ लक्ष खर्च करून बांधण्यात आला असून ४ वर्षातच सदर रस्त्यावर मोठमोठ्या भेगा पडल्याने सातत्याने अपघात होत असून प्रवाशांचा मृत्यु होवून काही प्रवासी जखमी होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, "एच. जी. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड" या कंत्राटदारामार्फत सदर रस्त्याचा हमी कालावधी ५० वर्षाचा देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काटोल ते वरुड मार्गावर पडलेल्या मोठ्या भेगांमुळे जलालखेडा येथील पेट्रोलपंपाजवळ झालेल्या अपघातात एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच याच रस्त्यावर असलेल्या पाडरसिंगा, भारसिंगी व जलालखेडा येथील नदीच्या पुलाचे काम देखील अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन सदर रस्त्याची दुरुस्ती करणे तसेच अपुर्ण पुलाची कामे त्वरीत पुर्ण करण्याबाबत व दोषी कंत्राटदार आणि याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) नागपूर- काटोल- वरुड- परतवाडा हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३-J असून हा महामार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारीत येतो. या महामार्गावरील कि.मी. ६०/ १०० ते कि.मी. १००/५६५ (एकूण लांबी ४०.४६५ कि.मी.) या लांबीतील सिमेंट काँक्रीट दुपदरीकरण पेव्हड शोल्डरसह चे काम जानेवारी,२०२० मध्ये पूर्ण झाले असून सदर कामाचा दोष दायित्व कालावधी दिनांक ०८.०७.२०२४ पर्यंत होता. सदर दोष दायित्व कालावधीमध्ये या महामार्गावर काही ठिकाणी भेगा पडल्याचे निदर्शनास आल्यानंतर कंत्राटदाराद्वारे भेगांची आवश्यक दुरुस्ती करण्यात आली.

पोलिस विभागाच्या अहवालानुसार सन २०२३ नंतर या महामार्गावरील अपघातांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

पोलिस विभागाच्या अहवालानुसार जलाल खेडा येथील पेट्रोल पंपाजवळ झालेल्या अपघातामध्ये दुचाकी स्वाराचा मृत्यु झाला आहे. परंतु, सदर अपघात हा महामार्गावरील भेगांमुळे झाला नसून दुचाकीस्वाराने भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे व निष्काळजीपणामुळे झाला आहे.

(४) व (५) नागपूर- काटोल- वरुड- परतवाडा राष्ट्रीय महामार्ग क्र. ३५३ –J या महामार्गावरील पारडसिंगा (कि.मी. ६७/४१०), भारसिंगी (कि.मी. ७६/३१०), जलालखेडा (कि.मी. ८०/७५० व कि.मी. ८०/९००), रोशनखेडा (कि.मी. ९७/७३४) येथील पुलांचे काम तसेच रोशनखेडा (कि.मी. ९७/३८०) येथील उड्डाणपुलाचे काम भूसंपादन प्रक्रिया व वन विभागाच्या परवानगीमुळे अप्राप्त असल्याने सदर पूल व उड्डाणपुलाच्या कामाची व्याप्ती मूळ करारनाम्यातून वगळण्यात आली होती.

सद्यास्थितीमध्ये भूसंपादनाची बहुतांश कार्यवाही पूर्ण झाली असून वन विभागाच्या परवानगीची कार्यवाही प्रगतीत आहे.

उर्वरित पूल व उड्डाणपूलाच्या कामांची नव्याने निविदा मागविण्यात आली असून निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्या नंतर महामार्गावरील उर्वरित काम सुरु करण्याचे नियोजन आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रहाटगाव ते वडगाव माहोरे रस्त्यानजीक (अमरावती शहर) राखेमुळे परीसरात प्रदूषण होत असल्याबाबत

**(१३) * ७९९० श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि. अमरावती) शहरातील रहाटगाव ते वडगाव माहोरे रस्त्याचे काम जनरल मॅनेजर तथा प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ऑफ अथोरीटी ऑफ इंडिया यांचेद्वारे करण्यात आले असून सदर उड्डाणपुलाच्या बांधकामाची पाहणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दिनांक ०८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गालगत असलेल्या शिवमंदिराच्या विरुध्द दिशेने अंदाजे १ एकर जागेवर राखेची (Fly ash ) साठवणुक योग्य ती उपाययोजना न करता केली असून १० वृक्षांची साठवणुकीकरीता अवैधरित्या वृक्षतोड करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी साठवणुक केलेल्या राखेच्या धुलीकणांमुळे हवा प्रदुषित होऊन महामार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून वाहन चालकांच्या डोळयात राखीचे धुलीकण जाऊन अपघात होऊन जिवितहानी होत असून नागरीकांना श्वसनाचे आजार झाल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलिस निरिक्षक, नांदगांव पोलिस ठाणे, (जि. अमरावती), यांना महानगरपालिका, अमरावती यांनी लेखी कळविले असूनही पोलिस दलाकडून कारवाई करण्यात आली नसल्याचे दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित पोलिस निरिक्षक, व प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे अथोरीटी ऑफ इंडिया यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे,

धुळे-जळगांव-खामगांव-अमरावती-नागपूर-भंडारा हा राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ असून, सदर महामार्गावरील रहाटगाव येथील रिंग रोड टी जंक्शनवरील (कि.मी.१४७/३००) अपघातप्रवण स्थळावर दीर्घकालीन प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून भुयारी मार्ग बांधकामाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे.

(२) नाही, हे खरे नाही,

राखेची (Fly ash) साठवणूक करण्याकरिता वापरलेल्या जागेत कोणतीही वृक्षतोड करण्यात आलेली नाही. तसेच भुयारी मार्गाच्या कामात अडथळा देणारी झाडे अमरावती महानगरपालिकेची रितसर परवानगी घेऊन, तसेच सुरक्षा ठेव रक्कम (Security Deposit) जमा करुन तोडण्यात आलेली आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या (MORT&H) दिनांक २६.०९.२०२३ च्या परिपत्रकानुसार, राखेचा (Fly ash) वापर रस्ता बांधकामासाठी अनिवार्य करण्यात आलेला आहे. त्याला अनुसरून भरावासाठी राखेचा (Fly ash) वापर करण्यात येत आहे. पावसाळ्यात भरावासाठी राखेचा तुटवडा होऊ नये म्हणून संबंधित ठेकेदाराद्वारे रहाटगावजवळच वडगाव माहोरे येथे राखेची साठवणुक केलेली आहे. सदर ठिकाणी हवा प्रदुषण न होण्याचा दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. राख पूर्णतः हिरव्या जाळीने झाकणे, नियमितपणे पाण्याची फवारणी (Sprinkling) करणे इ. तसेच राखेच्या सभोवतालच्या मातीला आद्र करुन राख उडून प्रदुषण होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे.

(४) हवा प्रदुषण होऊन परिसरातील नागरिकांना व महामार्गावरील वाहतूकीस अडथळा निर्माण होत असलेबाबत शहर अभियंता, अमरावती महानगरपालिका यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ३.६.२०२५ रोजी उड्डाणपूलाच्या बांधकामाचे कॉन्ट्रक्टर यांचे विरुध्द नांदगाव पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेतील (जि.पुणे) केशवनगर येथील गायरानाच्या बारा ठिकाणी असलेल्या नैसर्गिक ओढ्यांमध्ये डेब्रिज टाकल्याबाबत

**(१४) * ७९४४ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये (जि. पुणे) समाविष्ट केलेल्या केशवनगर येथील गायरानाच्या १२ ठिकाणी असलेल्या नैसर्गिक ओढ्यात राडारोडा टाकून नदीचे अस्तित्व संपुष्टात आणल्याचे दिनांक ६ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली असून त्यावर अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शानास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) व (३) पुणे महानगरपालिकेच्या हडपसर-मुंढवा क्षेत्रिय कार्यालया मार्फत यापूर्वी त्याठिकाणी राडारोडा टाकणाऱ्यांवर दि.२०.१२.२०२४, १४.०६.२०२४ व दि.२५.०३.२०२५ रोजी दंडात्मक कारवाई करुन एकूण रक्कम रुपये २०,००० इतकी रक्कम वसुल करण्यात आली आहे. तसेच क्षेत्रिय कार्यालय मार्फत राडारोडा टाकणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याबाबत दि.१४.०५.२०२५ च्या पत्रानुसार वरिष्ठ पोलीस निरिक्षक मुंढवा पोलीस स्टेशन

दि.२७.०५.२०२५ च्या पत्रानुसार पोलीस निरिक्षक (वाहतूक) मुंढवा पोलीस स्टेशन यांना कळविण्यात आले असून पोलीस विभागामार्फत संबंधितावर कारवाई सुरु आहे.

पुणे महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणी राडारोडा टाकू नये याकरिता खालील प्रतिबंधात्मक उपाय योजना प्रस्तावित केल्या आहेत.

- पुणे महानगरपालिका सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- पुणे महानगरपालिकेमार्फत सदरच्या जागेचे संरक्षण करण्याकरिता सिमाभिंत बांधणे, पुणे मनपाचे नामफलक लावणे, सिसीटीव्ही बसविणे इ. बाबींची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौ.घोडबंदर (जि.ठाणे) येथील जमिन नियमबाह्यरित्या एका तारांकित हॉटेलला दिल्याबाबत**

**(१५) * १३७४१ श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) महानगरपालिका हद्दीत मौ.घोडबंदर येथील स.क्र ९२/१/अ, /१/ब, ७७/ब/१,२३४/ब/१ या जमिनीवर जीसीसी हॉटेल प्रा.लि.यांनी शासनाची फसवणूक करून परवानगी प्राप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हॉटेल मालकास महानगरपालिकेने जमिनीची मोजणी तथा विभागणीचा अहवाल नसताना दिनांक १७/१०/१७ रोजी वा त्यासुमारास जीसीसी हॉटेलच्या मालकीची ६९१० चौ.मी इतकीच जागा असताना तारांकित हॉटेल म्हणून ८७०० चौ.मी. इतक्या जागेत बांधकाम परवानगी दिलेली असून सदर परवानगी घेताना संबंधित जागा मालकाची नाहरकत किंवा मंजुरी नसताना मालकीपेक्षा जास्त जागेवर परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याकरता आवश्यक डीसी रूल ३४(४) नुसार १८ मीटर रुंदीचा रस्ता व तारांकित हॉटेल म्हणून परवानगी घेताना विभागीय उपसंचालक नगररचना, स्थानिक विकास प्राधिकरण, मा.पोआयुक्त व मा.संचालक पर्यटन यांच्या समितीची परवानगी घेणे बंधनकारक असतांना महानगरपालिकेने नियमबाह्य परवानगी दिली तसेच सदर हॉटेल मालकाने पुन्हा दिनांक ०८/०७/२४ रोजी वा त्यासुमारास त्याच जागेवर सुधारित परवानगी प्राप्त केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास,चौकशीच्या अनुषंगाने नियमबाह्य पद्धतीने दिली गेलेली परवानगी तात्काळ रद्द करून संबंधित हॉटेल मालक व अधिकारी यांचेविरुद्ध एमआरटीपी अंतर्गत आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) मौजे घोडबंदर येथील स.क्र.९२/१ च्या जमिनीचे हिस्सेनुसार मोजणी नसली तरी सन-१९९३ च्या पूर्व मंजूरीनुसारच्या रेखांकनानुसार स .क्र. ९२/१ मधील सहहिस्सेदार यांचेनुसार हद्दी कायम ठेवून, सदर जमिनीचे स.क्र. ९२/१ पैकी व इतर जमिनीवर वेळोवेळी महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(३), (४) व (५)

• मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी लागू असलेल्या तत्कालीन (तत्कालीन नगरपरिषद) मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील तरतूदीनुसार ४ स्टार व ५ स्टार हॉटेलकरिता, विभागीय उपसंचालक नगररचना, स्थानिक विकास प्राधिकरण, पोलिस आयुक्त व संचालक पर्यटन यांच्या समितीची परवानगी घेणे आवश्यक होते.

• तथापि, दरम्यानच्या कालावधीमध्ये दि.०३.०८.२००४ रोजीच्या अधिसुचनेद्वारे विभागीय उप संचालक नगररचना, कोकण विभाग यांचा सल्ला/ सहमती घेणेबाबतची नियमावलीतील तरतुद रद्द केली आहे.

• तद्नंतर दि.१४.०३.२०१६ रोजीच्या निर्देशानुसार यापूर्वीचे सर्व नियम / निर्देश रद्द करून शैक्षणिक, वैद्यकीय व तारांकित हॉटेलकरिता अधिमूल्य रक्कम आकारून वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देण्याचे सर्व अधिकार संबंधित महानगरपालिकेच्या आयुक्तांना प्राप्त झाल्याने, नियमावलीतील तरतूदीनुसार सदर प्रकरणी महानगरपालिकेने परवानगी दिलेली आहे.

• दि.०२.१२.२०२० अन्वये लागू केलेल्या एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियम (UDCPR) मधील तरतूदनुसार महानगरपालिकेने भुमी अभिलेख विभागाकडील स.क्र.९२/१ या जमिनीचा दि.१७.०१.२०२४ रोजीचा मोजणी नकाशा, ७/१२ उताऱ्यानुसारचे क्षेत्र व प्रत्यक्ष जागेवरील क्षेत्र यापैकी कमी असलेले क्षेत्र तसेच, किमान रूंदीच्या रस्त्यानुसार चटई क्षेत्र निर्देशांक विचारात घेऊन दि.०८.०७.२०२४ रोजी सुधारित विकास परवानगी दिलेली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात (जि.पालघर) आरक्षित भूखंडांवर अनधिकृत इमारती बांधल्याबाबत

**(१६) * ९५०२ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका क्षेत्रात शासनाचे अंदाजे ८७४ आरक्षित भूखंड असून त्यापैकी ४०० भूखंडावर अंदाजे ४ लाख ९५ हजार २८५ अनधिकृत बांधकामे झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंड हे शाळा, खेळाचे मैदान, उद्याने, डंपिग ग्राउंड, वाहनतळ, रुग्णालय आदी सार्वजनिक गोष्टींच्या वापराकरिता आरक्षित असल्याने शहरातील नागरिक मुलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अंदाजे २ हजार ८४७ अनधिकृत बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नोटीसा बजविण्यात आल्या आहेत, अंदाजे ५०१ प्रकरणे सध्या नागरी न्यायालयात प्रलंबित असून त्यापैकी १२७ प्रकरणांमध्ये स्थगिती आदेश देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका प्रशासनाकडून अनधिकृत बांधकामांवर वेळीच कारवाई न झाल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत असून महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली तरी कारवाई झालेले बांधकाम पुन्हा उभे राहात असल्याचे तसेच अंदाजे १७६ इमारतींमध्ये नियोजित मंजुरीपेक्षा अधिक बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नवीन विकास आराखडा (DP) तयार करताना या अशा आरक्षित भूखंडांबाबत शासनाचे सर्वसाधारण धोरण काय आहे,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम करून शासनाचे विकास शुल्क न भरण्याऱ्या विकासकांवर व अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

(२) खरे नाही.

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात ८७२ भूखंड हे विविध प्रयोजनाकरिता आरक्षित आहेत. सदर भूखंडांपैकी ५६ भूखंड हे महानगरपालिकेच्या ताब्यात असून ते हस्तांतरणीय विकास हक्का (TDR) च्या माध्यमातून विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच, वसई विरार महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील १५३ उद्याने, २१ नागरी आरोग्य केंद्र, ०५ रुग्णालये, ०२ माता बाल संगोपन केंद्र, १५ आपला दवाखाने, ५ आरोग्य मंदिरे, १३० बसेस याद्वारे नागरिकांना सुविधा पुरविल्या जातात. तसेच, निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून दैनंदिन करण्यात येते. त्यामुळे शहरातील नागरिक मुलभूत सुविधांपासून वंचित नाहीत.

(३) खरे नाही.

(४) वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मूलन विभागातील महानगरपालिका स्थापनेपासून ते आजतागायत निदर्शनास आलेली अनधिकृत बांधकामे १६,२२३ इतकी असून ७,८९६ अनधिकृत बांधकामांना नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. पैकी MRTP कायद्यांतर्गत ११६६ नोटीस देण्यात आलेल्या आहेत व ३९४ अनधिकृत बांधकामांवर गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.
(५) नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रासाठी विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर व सार्वजनिक सुविधांसाठी लोकसंख्या प्रक्षेपित करून प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात येतो. त्यामध्ये प्रक्षेपित लोकसंख्या नियोजन प्राधिकरणाच्या क्षेत्रातील नागरीकरणाचे वेग आवश्यक सोयी सुविधा, इत्यादींचा सखोल अभ्यास करून, आवश्यक सोयी सुविधांसाठी रस्ते तसेच भूखंड प्रस्तावित करण्यात येते.
(६) महानगरपालिकेतर्फे प्रत्येक प्रभागात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निर्मूलनाकरिता पदनिर्देशित अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त यांची नियुक्ती केलेली आहे. पदनिर्देशित अधिकारी यांच्यामार्फत अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे यांची दैनंदिन पाहणी करुन वेळोवेळी निष्कासित केली जातात.

-----------------

## चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील इमारतीला परवानगी देताना झालेला गैरव्यवहार

**(१७) * ७३०८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरातील सर्व्हे नं. १५२, सिटी सर्व्हे नं. ६५३४ या मिळकतीमध्ये इमारतीचे बांधकाम करण्यासाठी नगरपरिषद, चिपळूण यांनी डॉ. विशाल मधुकर पुजारी यांना दि. १८ एप्रिल, २०२१ रोजी परवानगी दिली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामास परवानगी देताना मोठया प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याने डॉ. पुजारी यांनी सादर केलेला नकाशा व मिळकत पत्रिकेची छाननी न करता नगरपरिषदेने परवाना दिला असून मिळकतीमध्ये नियोजित भूखंडाच्या दर्शनी भागात श्री. रमेश सकपाळ यांना स्वतंत्र परवाना देण्यात आलेला असताना याच भूखंडामध्ये कोणतीही उपविभागणी किंवा विभाजन न करता एकत्रित भूखंडामध्ये डॉ. पुजारी यांना बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त विषयासह अन्य वेगवेगळया प्रकारे नगरपरिषद व डॉ. पुजारी यांनी नियम व अटींचे उल्लंघन केल्याची तक्रार श्री. मोहन मिरगल, माजी नगरसेवक, चिपळूण यांनी दि. १३ जून २०२३ रोजी जिल्हाधिकरी, रत्नागिरी यांचेकडे करुनही अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दि. १३ मे २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) चिपळूण नगरपरिषदेने श्रीम.उज्वला वसंत चितळे, श्री.अभय वसंत चितळे, श्री.अतुल वसंत चितळे, श्री.रमेश गणेश सकपाळ, श्री.विशाल मधुकर पुजारी यांना एकत्रित सुधारीत बांधकाम करण्यास दि.०८/०४/२०२१ रोजी परवानगी दिली.
(२) बांधकाम परवानगीसाठी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केली असता सदर भूखंडावर दोनही इमारतींना एकत्रित बांधकाम परवानगी देण्यात आली असून बांधकाम परवानगीच्या मंजूर नकाशावर श्री.रमेश गणेश सकपाळ व श्री.विशाल मधुकर पुजारी यांची स्वाक्षरी आहे.
(३) व (४) यासंदर्भात मा.मंत्री (नगर विकास) व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे निवेदन प्राप्त झाले असून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने चिपळूण नगरपरिषदेने चौकशी व स्थळ पाहणी केली आहे. स्थळ पाहणीमध्ये श्री.विशाल मधुकर पुजारी यांची मिळकत डॉ.हर्षद रमाकांत परब यांनी खरेदी केल्याचे दिसून आले असून साईट मार्जिनमध्ये पत्राशेडचे बांधकाम

आढळून आले. सदर अनधिकृत पत्राशेडच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील तरतूदीनुसार कार्यवाही प्रस्तावित केली असून संबंधितांना खुलासा सादर करण्याबाबत नगरपरिषदेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयासाठी शासनाकडून वाढीव धान्याचा इष्टांक मंजूर करण्याबाबत

**(१८) * ९४१८ श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयात शासनाकडून वाढीव धान्याचा कोटा (इष्टांक) मंजूर न झाल्यामुळे अंत्योदय रेशनकार्डाची पाचशे लाभार्थी कुटुंब व ६० हजार लाभार्थी रेशनवरील धान्यापासून वंचित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचा इष्टांक पूर्ण झाला असल्याने तसेच नवीन शिधापत्रिका काढता येत नसल्याने अल्प उत्पन्न धारक, विधवा, दिव्यांग व मजुरांना अन्न सुरक्षा योजनेपासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच , पिंपरी -चिंचवड शहरातील तिन्ही परीमंडळ कार्यालयातील इष्टांक वाढत्या लोकसंख्येनिहाय वाढविण्याबाबत व मागील दोन वर्षापासून प्रलंबित असलेला परीमंडळ कार्यालयनिहाय सुधारित इष्टांक वाटप करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चिंचवड मतदारसंघात सुधारित इष्टांकाचे परिमंडळ निहाय वाटप करताना AAY (२१५) आणि PHH (१६१९८०) संख्याचे अवलोकन करून त्याप्रमाणात अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत जिल्हानिहाय इष्टांकाचा सुधारित कोटा वाटप करताना कोटा वाढवून देण्याबाबत चिंचवडचे लोकप्रतिनिधीनी मा. उपमुख्यमंत्री तथा अन्न नागरी पुरवठा मंत्री यांना दिनांक १७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास,विहित शहरातील पुरवठा निरीक्षकांना पदोन्नती देऊन शहरातच परिमंडळ अधिकारी म्हणून नेमणूक दिल्याने काळाबाजार करणाऱ्या रेशन दुकानदार व रेशन माफियांचे आर्थिक संगनमत असल्याने मोठ्या प्रमाणावर शहरातील अन्न नागरी पुरवठा विभागाच्या कारभारावर शिथिलता येऊन धान्याचा व गॅस सिलेंडरच्या काळाबाजाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन पुणे जिल्ह्यातील अशा रेशनिंग दुकानादारांचा परवाना कायमस्वरूपी रद्द करुन इष्टांक मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
शासन निर्णय दि.०१.०४.२०२५ अन्वये सुधारित इष्टांकाचे जिल्हानिहाय पुनर्वाटप करण्यात आलेले आहे.
(४) सन्मा. विधान सभा सदस्य, चिंचवड यांनी मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (अनापुवग्रासं) यांचेकडे दिनांक १७ मे, २०२५ रोजी लेखी पत्राद्वारे मागणी केली होती.
(५) व (६) अन्न धान्य वितरण अधिकारी, पुणे यांचे अधिनस्त परिमंडळ कार्यालयांकडून रास्तभाव दुकानांच्या माहे मे-जून २०२५ च्या नियमित तपासणीवेळी ३२ रास्तभाव दुकाने किरकोळ दोषी आढळून आले असून त्यांचेवर कार्यवाही करणे सुरू आहे. तसेच, जिल्हाधिकारी पुणे यांच्या दि. ५.०३.२०२५ रोजीच्या आदेशानुसार गॅस अवैध डिलरच्या तपासणीबाबत जिल्हास्तरीय पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. सदर तपासणीमध्ये अवैध गॅस डिलरवर विविध पोलीसस्टेशन मध्ये १९ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत व या गुन्ह्यांमध्ये ६५१ गॅस सिलेंडर इतका मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि. ठाणे) महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींबाबत

**(१९) * ११७६७ श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महनगरपालिका क्षेत्रात गेल्या अनेक वर्षापासून धोकादायक इमारतींचा प्रश्न प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेने धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची यादी जाहीर करुनही यामध्ये राहणा-या रहिवाशांचे योग्य रितीने पुनर्वसन करण्याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शानास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,महानगरपालिका क्षेत्रात धोकादायक व अतिधोकादायक इमारतींमध्ये आजही हजारो नागरिक जीव मुठीत घेऊन राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त इमारतींमधील रहिवाशांचे योग्य रितीने पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका क्षेत्रातील संभाव्य धोकादायक व अतिधोकादायक इमारतींचे लक्षणे नमूद करून सदर लक्षणाच्या आधारे "मान्यताप्राप्त व योग्य अर्हताधारक अभियंत्यामार्फत इमारतींचे Structural Audit करून घेऊन" त्याचा अहवाल महानगरपालिका प्रशासनास सादर करण्याचे आवाहन संबंधित गृहनिर्माण संस्था / इमारत धारकांना दरवर्षी करण्यात येते.

• प्राप्त Structural Audit अहवालाच्या आधारे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक व अतिधोकादायक घोषित करण्यात आलेल्या इमारतींवर अधिनियमातील तरतूदीनुसार निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील धोकादायक / अतिधोकादायक इमारती मध्ये राहणाऱ्या रहिवाशांचे कायमस्वरूपी पुनर्वसन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत नाही. परंतु, आपात्कालीन परिस्थितीत सदर रहिवाशांच्या राहण्याची व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात महानगरपालिकेमार्फत महापालिका क्षेत्रातील शाळेत / निवारा केंद्रात करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात सी-१ (अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्ग) प्रवर्गामध्ये एकूण २५६ इमारती अतिधोकादायक आढळून आलेल्या आहेत. त्यापैकी ५१ इमारती निष्कासित करण्यात आलेल्या आहेत. तर ७१ इमारती रहिवासमुक्त करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित १३४ अतिधोकादायक इमारतींमध्ये रहिवास असून, सदर इमारती रहिवासमुक्त करण्याची कार्यवाही सुरू आहे.

• तसेच, सी-२ए प्रवर्ग (इमारत रिकामी करून संरचनात्मक दुरूस्ती करणे प्रवर्ग) मध्ये एकूण ८५ धोकादायक इमारती असून, सदर इमारतींना दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेमार्फत नोटिस देण्यात आलेल्या आहेत.

• सी-२बी प्रवर्ग (इमारत रिकामी न करता संरचनात्मक दुरूस्ती करणे प्रवर्ग) मध्ये एकूण ३०३ धोकादायक इमारती असून, सदर इमारतींना तात्काळ दुरूस्ती करणेबाबत महानगरपालिकेमार्फत नोटिस देण्यात आलेल्या आहेत.

(४) एकत्रितकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे विनियम ७.६ मध्ये जुन्या मोडकळीस आलेल्या / धोकादायक इमारती तसेच ३० वर्ष जुन्या झालेल्या इमारतींच्या पुनर्विकासासंबंधी विशेष तरतूदी करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक राष्ट्रीय महामार्गाच्या काँक्रिटीकरणाचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून सुरक्षेची उपाययोजना न केल्यामुळे नागरिकांचे झालेले मृत्यू

**(२०) * ९४६७ श्री.अमोल खताळ (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे आंबीखालसा फाटा ते चंदनापुरी घाटादरम्यान काँक्रिटीकरणाचे काम सुरू असून संबंधित ठेकेदाराकडून सुरक्षेची कोणतीच उपाययोजना न केल्याने माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास झालेल्या २० अपघातांमध्ये ९ नागरिकांचे मृत्यू होवून पाचजण गंभीर जखमी झाले आहेत तसेच अनेक वाहनांचे प्रचंड नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू करण्याअगोदर संबंधित ठेकेदाराने प्रथम अपघात टाळण्यासाठी आणि वाहनचालकांना त्रास होऊ नये, याकरिता उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दर रविवारी पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर छोट्या-मोठ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरु असल्यामुळे वाहतूककोंडी होत असते , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरहू राष्ट्रीय महामार्गावर अपघात रोखण्यासाठी तसेच सुरक्षेची उपाययोजना न करणाऱ्या, नागरिकांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या संबंधित ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे,

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.६० या महामार्गावरील काँक्रिटीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचे मार्फत प्रगतीपथावर आहे. या महामार्गावर आंबीखालसा फाटा ते चंदनापुरी घाटादरम्यान काँक्रिटीकरणाचे काम नियुक्त ठेकेदारामार्फत सुरु असून वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने दिशादर्शक फलक व सूचनाफलक इ. उपाय योजना करण्यात आल्या आहेत.

माहे मार्च, २०२५ वा त्यासुमारास झालेले अपघात हे Traffic Diversion च्या ठिकाणी वाहनांचे Over Speeding ओव्हरटेकींग व वाहन चालकांनी वाहतूकीचे नियम न पाळल्यामुळे झालेले आहेत.
(२) हे खरे नाही,

पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग क्र.६० या महामार्गावर आंबीखालसा फाटा ते चंदनापुरी घाटादरम्यान काँक्रिटीकरणाचे काम सुरू करण्यापूर्वी संबंधीत ठेकेदाराने Traffic Diversion चे प्लान तयार करुन तसेच संबंधीत पोलीस विभागाशी समन्वय साधून संबंधीत ठिकाणी वाहतूक वळविणेबाबतचे दिशादर्शक फलक लावून व वाहतूकीच्या दृष्टीने इतर सुरक्षा उपाययोजना करुन काम सुरु केले आहे.
(३) व (४) पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर काही ठिकाणी एकेरी वाहतूकीमुळे व काही ठिकाणी कॉकिटीकरणाचे काम चालू असल्यामुळे रविवारी /सुटटीच्या दिवशी वाहतूक कोंडी झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि Traffic Diversion च्या ठिकाणी अधिक सुरक्षा यंत्रणा व मनुष्यबळ पुरविण्यात आले असून वाहतूक कोंडी होणार नाही याची वेळोवेळी दक्षता घेण्यात आलेली आहे. आवश्यक अशा सर्व सुरक्षा उपाय योजना अंमलात आणून काम विहित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कुळगाव बदलापूर नगर परिषद (जि. ठाणे) क्षेत्रातील वडवली येथील बायोगॅस प्रकल्पाबाबत

**(२१) * ९३७० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुळगाव बदलापूर (जि.ठाणे) नगर परिषद क्षेत्रातील वडवली येथे सन २०१३ मध्ये सुमारे ८७ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या बायोगॅस प्रकल्पामधून आजतगायत एक युनिटही वीज निर्मिती झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बायोगॅस प्रकल्पावर सन २०१८ पासून वेळोवेळी देखभाल दुरुस्ती करण्याकरिता लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांनी संगनमताने देखभाल दुरुस्तीच्या नावाने शासकीय निधीचा अपव्यय केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर बायोगॅस प्रकल्प तातडीने पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेबाबत तसेच यातील दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) कुळगांव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रातील मौजे वडवली येथील स्मशानभूमीच्या जागेमध्ये भाभा अनुसंशोधन केंद्र यांच्या तंत्रज्ञानावर आधारित ५ टनाचा बॉयोगॅस प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आला. प्रकल्प उभारणीचा मुख्य उद्देश गॅस निर्मिती करुन उत्पन्न मिळविणे हा नसून शास्त्रोक्त पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणे आहे.
(२) (३) व (४) कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने बॉयोगॅस प्रकल्पाच्या कामाकरीता निविदा मागवून मे.विविम ॲग्रोटेक, औरंगाबाद यांना काम दिले होते. त्यांना केलेल्या कामाचे रु.३५.८२ लक्ष इतक्या रकमेचे देयक अदा करण्यात आले. तथापि, पुढील काम न केल्याने त्यांना नोटीस बजावून कंत्राट रद्द करण्यात आले. सदर प्रकल्पाबाबत वरिष्ठ वैज्ञानिक, भाभा अनुसंशोधन केंद्र यांनी काही बदल सुचविल्याने नव्याने निविदा मागवून मे.अवनी एन्टरप्राईजेस, डोंबिवली यांचेमार्फत प्रकल्पामध्ये सुधारणा करण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून त्यासाठी रु.३०.६२ लक्ष इतका खर्च झालेला आहे. प्रकल्पाचा दायित्व कालावधी संपल्यानंतर सदर प्रकल्पाच्या देखभाल व दुरुस्तीसाठी नव्याने निविदा मागवून मे.अवनी एन्टरप्राईजेस यांना ५ वर्षाच्या कालावधीसाठी देखभाल दुरुस्तीचे कंत्राट देण्यात आले. या प्रकल्पासाठी आरोग्य विभागामार्फत ओला कचरा वर्गीकृत करुन पुरविण्यात येत असून प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर घोडबंदर ते अच्छाड रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२२) * ७५१९ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील घोडबंदर ते अच्छाड या १२५ किलोमीटरच्या टप्प्यात केलेल्या काँक्रिटीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून या मार्गावर पावसाळा सुरू होण्यापूर्वीच खड्डे पडल्याने अपघात होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या कामासाठी सुमारे ६०० कोटी रुपये इतका खर्च केला असून सदर रस्त्यावर झालेल्या अपघातात ३० पेक्षा अधिक नागरिकांना जीव गमवावा लागल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :**(१) अंशत: खरे आहे,

मुंबई-अहमदाबाद हा राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ देखभाल दुरुस्तीसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचेकडे आहे.

NHAI ने आच्छाड (किमी ३८१) ते दहिसर (किमी ५०२) (१२१ किमी) या संपूर्ण भागाचे व्हाईट टॉपिंग करण्याचे काम हाती घेतले आहे. सद्यस्थितीत सुमारे ९८% व्हाईट टॉपिंगचे काम पूर्ण झाले आहे.

सदर काम सुरू असताना काही वेळा नुकत्याच केलेल्या काँक्रिटीवरुन वाहतूक गेल्याने काही ठिकाणी खड्डे तसेच टायर मार्क्स आढळून आलेले आहेत. त्याची दुरूस्ती कंत्राटदारामार्फत प्रगतीत आहे.
(२) अंशत: खरे आहे,

पोलिस विभागाच्या अहवालानुसार माहे जानेवारी २०२५ ते माहे जून २०२५ या कालावधीत ५० गंभीर अपघात

झाल्याची नोंद आहे. सदरचे अपघात हे चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

सद्यस्थितीत सदर रस्त्याच्या कामावर रु.४०० कोटी खर्च झाला आहे. महामार्ग सुरक्षिततेच्या दृष्टीने तीन भुयारी मार्ग व दहा पादचारी पुल (FOB) यांची कामेही स्वतंत्रपणे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

(३) दुरुस्तीच्या कामात कंत्राटदाराकडून झालेल्या विलंबाबद्दल, कंत्राटदाराला एप्रिल-२०२५ मध्ये तीन महिन्यांसाठी निविदा प्रक्रियेसाठी प्रतिबंधित केले आहे तसेच जर काम वेळेत पूर्ण झाले नाही तर कंत्राटदारावर कठोर कारवाई केली जाईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात रुग्णाचा झालेला मृत्यू**

**(२३) * ७५३६ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात डॉक्टरांनी उपचार करण्यास टाळाटाळ केल्यामुळे ७ तास उपचाराविना रुग्णालयात पडून असल्याने श्री. बाळू कटके या रुग्णांचा दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास मृत्यु झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृत बाळू कटके यांच्या मुलांने अधिष्ठाता, डॉक्टर व इतरांनी उपचारा दरम्यान हलगर्जीपणा केल्या संदर्भात सचिव, सार्वजनिक आरोग्य, आयुक्त आरोग्य विभाग व राज्य मानवाधिकार यांच्याकडे दिनांक ११ एप्रिल,२०२५ रोजी वा त्या सुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने संबधित डॉक्टरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

श्री.बाळू कटके, वय ८६ यांच्यावर दि.१२.०२.२०२५ रोजी अपघातानंतर मेंदुतील रक्तस्त्रावाकरिता मोठी शस्त्रक्रिया सोलापूर येथे खाजगी रुग्णालयात करण्यात आली. तथापि, प्रकृतीत सुधारणा न झाल्याने नातेवाईकांनी त्यांना दि.०७.०३.२०२५ रोजी पुढील उपचाराकरिता लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय, शीव येथे दाखल केले. तेथे श्री.कटके यांच्यावर योग्य व वेळेत उपचार करण्यात आले. तथापि, त्यांचा दि.१२.०३.२०२५ रोजी मृत्यू झाला.

(२) सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग व आयुक्त आरोग्य विभाग यांच्या अभिलेखामध्ये मृत बाळू कटके यांच्या मुलाने अधिष्ठाता, डॉक्टर व इतरांनी उपचारादरम्यान हलगर्जीपणा केल्यासंदर्भात, कोणतीही तक्रार केल्याचे आढळून आली नाही. तथापि, मा. राज्य मानवी हक्क आयोगाने वृत्तपत्रातील श्री.बाळू कटके यांच्या मृत्यूच्या बातमीची दखल घेत दि.१२.०३.२०२५ रोजी सु-मोटो केस दाखल करुन घेतली.

(३) मा.राज्य मानवी हक्क आयोगाने श्री.बाळू कटके यांच्या उपचाराबाबतचा अभिलेख पाहून लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाने श्री.बाळू कटके यांच्यावर योग्य ते उपचार केले असल्याने सदर केस बंद करत असल्याचा दि.३०.०४.२०२५ रोजी निर्णय दिला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर प्रख्यात कंपन्यांच्या नावाची बनावट औषधांची विक्री होत असल्याबाबत**

**(२४) * ९१५३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परराज्यातून महाराष्ट्रात येणारी औषधे भेसळयुक्त होऊ नयेत, यासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या औषधांची अन्न व औषध प्रशासनाकडे नोंद असावी,असे सन २०२१ मध्ये प्रशासनाकडून सूचित करण्यात आले असून उत्पादक तसेच घाऊकपणे औषधांची खरेदी करणाऱ्या दुकानांमधून कोणत्याही सूचनांचे पालन केले जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत्रपती संभाजीनगरमध्ये बनावट औषध पुरवठा करणारी टोळी सक्रीय असून त्यांचेमार्फत बऱ्याच ठिकाणी प्रख्यात कंपन्यांच्या नावे बनावट औषधे विकली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बनावट औषधांच्या वितरणामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून यातील दोषींविरुध्द अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात बनावट औषधांचे उत्पादन आणि वितरण रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभाग आणि पोलीस यंत्रणेमार्फत कोणती प्रभावी उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाने दि.१६.१०.२०२३ च्या परिपत्रकान्वये परराज्यातून महाराष्ट्रात येणारी औषधे भेसळयुक्त असू नयेत याबाबतची माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीने जिल्हा व विभागीय स्तरावर स्वंतत्र ई-मेल तयार करावे व ते सर्व औषध विक्रेते यांच्या निदर्शनास आणून औषध विक्रेत्यांना परराज्यातील दैनंदिन औषध खरेदी बिले या ई-मेलवर पाठविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार स्वंतत्र ई-मेल आयडी निर्माण करण्यात आले आहेत.
(२), (३), (४) व (५) अन्न व औषध प्रशासनाने छत्रपती संभाजीनगर येथील शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथून विश्लेषणार्थ घेतलेल्या काही औषध नमुन्यांपैकी Curexim-२०० B. No SKS-C-५५१८"Cefixime Tablets IP २००mg" Mfg By: M/s. Skycure Solutions, Kerla ६८५५६१ हे औषध बनावट असल्याचे आढळून आले. त्यामुळे, संबधित औषध पुरवठादार व उत्पादक यांचेविरूद्ध दि.१६.०४.२०२५ रोजी प्रथम खबर अहवाल क्र.००८४ पोलिस स्टेशन बेगमपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे दाखल करण्यात आलेला आहे. तसेच, औषध पुरवठादारांचे परवाने रद्द करण्यात आले आहे.

अन्न व औषध प्रशासनाद्वारे नियमित तपासण्या करण्यात येत असून शासकीय रुग्णांलयातून संशयास्पद औषधांचे नमुने चाचणी व विश्लेषणासाठी घेण्यात येतात. औषध बनावट असल्याचे निदर्शनास आल्यास दोषीविरूद्ध संबधित पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येतो. तसेच, औषधे व सौदर्य प्रसाधने कायदा, १९४० व नियम १९४५ अन्वये न्यायालयीन कारवाई करण्यात येते.

-----------------

## परभणी शहरातील उड्डाणपूलावर अपघाताचे प्रमाण वाढत असल्याबाबत

**(२५) * ८४०१ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहरातील एकमेव उड्डाणपूलावर सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कोणत्याही उपाययोजना करण्यात आल्या नसल्यामुळे सदर पूलावर दिवसेंदिवस अपघाताचे प्रमाण वाढत असून जीवितहानी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ०२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास रात्री झालेल्या दोन दुचाकींच्या अपघातात दोन युवकांचा जागीच मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर पुलावर वाहनाची गती कमी करण्यासाठी गतीरोधक, सर्व प्रकारच्या वाहनांसाठी लेनची निश्चिती, सहा चाकापेक्षा अधिक मोठ्या अवजड वाहनांवर बंदी इत्यादी उपाययोजना करण्याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त उड्डाणपुलावरील वाढत्या अपघातांचे प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना करण्यासह याकडे दुर्लक्ष करणा-या संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे खरे नाही.

कल्याण-अहमदनगर-परभणी-नांदेड-निर्मल रोड हा राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ असून या महामार्गावरील परभणी शहरातील रेल्वे उड्डाणपूल (ROB) च्या सुधारीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीत आहे.

सदर कामांतर्गत वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने उड्डाणपूलावरील रस्त्याचे डांबरीकरण, वाहनांचा वेग कमी करण्यासाठी रंबल स्ट्रीप्स Road Marking इ. कामे करण्यात आली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) उड्डाणपूलावरील वाहनांचा वेग कमी करण्यासाठी उड्डाणपूलाच्या तिन्ही दिशेनी रंबल स्ट्रीप्स बसविण्यात आल्या असून सुरक्षिततेच्या दृष्टीने अन्य कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील सिडको परिसरातील नाल्यांची साफसफाई करण्याबाबत

**(२६) * १४४९६ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक (जि.नाशिक) महानगरपालिका हद्दीतील सिडको परिसरातील नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक व थर्माकोलचे तुकडे इत्यादी कचरा व घाण साचल्यामुळे पाण्याच्या वाहतूकीला अडथळा निर्माण होऊन ठिक-ठिकाणी नाले तुंबून परिसरात दुर्गंधी पसरली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको परिसरासह शहरातील नाल्यांची साफसफाई करण्याकडे महानगरपालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्यामुळे नाल्याच्या दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे परिसरात साथीच्या रोगाचे प्रमाण वाढून नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक येथील सिडको परिसरात नाल्यांची तातडीने साफसफाई करण्यासह नालेसफाई कडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) नाही, हे खरे नाही.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) नाशिक महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची कामे करण्यात येतात. त्यासाठी लागणारी मशिनरी वार्षिक देखभाल दुरुस्ती करणाऱ्या मक्तेदारांकडून घेण्यात येऊन विभागामार्फत कामे करण्यात येतात. माहे मे महिन्यापासून नाले साफ सफाई, पावसाळी आर.सी.सी. पाईप, गटार साफसफाई व पावसाळी खुली बांधकाम गटार साफसफाई करणे.

तसेच शहरात पावसाचे पाणी साचणाऱ्या क्रॉनिक फ्लडिंग स्पॉटच्या ठिकाणी पावसाचे पाणी निचरा होण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु करण्यात आली असून गावठाण व झोपडपट्टी भागातील पाणी साचणारी ठिकाणे हेरुन व आठवडाभर शहरात झालेल्या पावसाळामुळे निदर्शनास आलेल्या ठिकाणीच्या गटारीचे ढापे काढून साफ-सफाईची कामे करणेत आलेली आहे व पावसाळ्यात सदर कामे आवश्यकतेनुसार करणेत येतात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला महानगरपालिकेतील निविदा प्रक्रियेतील गैरव्यवहाराबाबत**

**(२७) * १२३४१ श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिकेत सुमारे ३०० कर्मचा-यांना आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून नोकरी दिली गेली असल्याचे दिनांक ३० एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आऊट सोर्सिंगची निविदा देताना महानगरपालिकेने नियमबाहय ठेका दिल्याने सदरील निविदा रद्द करण्यात आली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) अकोला महानगरपालिकेतर्फे एकूण २१६ पदांसाठी निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात आली.

(३) निविदा प्रक्रिया पार पाडून दि.२३ जानेवारी २०२५ रोजी निविदाधारकास कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर निविदा रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्र.२९१/२०२५ मधील सुनावणीदरम्यान केंद्र शासनाच्या दि.०६.०१.२०२३ च्या ज्ञापनानुसार निविदेच्या एकूण रक्कमेवर ३.८५% एवढे सेवाशुल्क आकारणे आवश्यक होते तथापि, महानगरपालिकेद्वारे कमी दराने निविदा स्वीकृत केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे निविदाधारकास देण्यात आलेला कार्यारंभ आदेश रद्द करण्यात आला.

त्यानंतर महानगरपालिकेद्वारे नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून दि.२४ जुन २०२५ रोजी नव्याने निविदाधारकांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईला पाणीपुरवठा करणा-या मुख्य जलवाहिनीच्या जवळील अनाधिकृत झोपडया हटविण्याबाबत**

**(२८) * १२६३६ श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईला पाणीपुरवठा करणा-या मुख्य जलवाहिनीला ठाणे येथे अनधिकृत झोपड्यांचा विळखा पडला असून महानगरपालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे व मुलुंडपर्यंतच्या भागात उक्त झोपड्या जलवाहिनीला लागूनच असल्यामुळे एखादी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदरहू अतिक्रमण हटविण्याबाबत व जलवाहिन्या सुरक्षित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या ठाणे शहरातून जाणाऱ्या मुख्य जलवाहिन्यांच्या बाजूला झोपड्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेडून जलवाहिन्यांच्या दोन्ही बाजूस १० मी. अंतरापर्यंत आढळून आलेल्या झोपड्यांचे निष्कासन करणेबाबत स्थानिक नियोजन प्राधिकरण म्हणून ठाणे महानगरपालिकेस कळविण्यात आले आहे.

ठाणे महानगरपालिका हद्दीत कोलशेत खाडी ते शिवाजीनगर वागळे इस्टेटपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेला पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन गेलेली आहे. सदर पाईप लाईनलगतच्या जागेत अतिक्रमणे, अनधिकृत झोपडपट्ट्या वसलेल्या असून सदरील अतिक्रमणे व झोपडपट्ट्या ह्या सन २००० पूर्वीच्या असून गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र.झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/ झोपसु-१,दि. २२ जुलै २०१४ अन्वये संरक्षण पात्र आहेत.

तथापि, सदर परिसरात नजिकच्या काळात झालेल्या व नव्याने होणाऱ्या अतिक्रमणांवर ठाणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी निष्कासनाची कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच, नियमितपणे करण्यात येत आहे.

मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजने अंतर्गत मौजे माजिवडे व मौजे पाचपाखाडी या भागात तानसा पाईपलाईन लगत असलेली बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागेवरील झोपडपट्टी निष्कासित करुन त्यांचे पुनर्वसन करण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईत स्वस्तात घर मिळवून देण्याच्या नावाने होत असलेली फसवणूक

**(२९) * १३२७४ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात विविध ठिकाणी म्हाडा, एसआरए, खासगी वसाहतीत घरांचे प्रलोभन दाखवून एजंट व शासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या संगनमताने नागरीकांना फसविण्याच्या घटना वारंवार वाढत असल्याचे मे, २०२५ वा त्या दरम्यान निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील भोईवाडा, पार्कसाईट, एम.एच.बी. कॉलनी, लोअर परळ, ताडदेव, काळाचौकी, बोरिवली, दहिसर इत्यादी विभागात १० टक्के कोट्याचे आश्वासन देत एजंटमार्फत मुंबईतील नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक पोलिस ठाण्यात नोंदविल्या गेल्या आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार एजंट, शासकीय अधिकारी/कर्मचारी व अन्य दोषीं यांच्या विरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत मानव हस्तक्षेपविरहित प्रक्रीयेव्दारे घरांचे वाटप करण्यात येते. तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा अंतर्गतही अशी बाबत निदर्शनास आलेली नाही.

(२) व (३) मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ८८२/२०११ व इतर याचिकांमध्ये दि.२०.०३.२०१४ रोजी दिलेल्या आदेशानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्वेच्छाधिकार कोट्यातून सदनिकांचे वाटप बंद करण्यात आले आहे.

१० टक्के कोट्यातून घरे देण्याबाबतच्या फसवणूकीच्या तीन तक्रारी बृहन्मुंबईतील दोन पोलिस स्टेशनमध्ये प्राप्त झाल्या आहेत. त्यानुषंगाने पुढील फौजदारी कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शताब्दी रुग्णालयात तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने रुग्णांचा झालेला मृत्यू

**(३०) * ८६२१ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.अमोल पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शताब्दी या मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयातील गैरसोयीमुळे चेंबूर- घाटला येथील श्री.अविनाश शिरगावकर या रुग्णाला प्राण गमवावा लागल्याचे दिनांक १० एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.शिरगावकर यांना सोमवारी रात्री मूत्र विसर्जनाचा त्रास होऊ लागल्याने त्यांना गोवंडीच्या शताब्दी रुग्णालयात नेले, मात्र शल्य चिकित्सक उपलब्ध नसल्याने दोन तासा नंतर त्यांना सायन रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सायन रुग्णालयात नेण्यात आल्यावर तेथे ही स्ट्रेचर उपलब्ध नसल्याने त्यांना काही मजले पायी जावे लागले, परंतु तेथे गेल्यावर संबंधित विभागात डॉक्टरच उपस्थित नसल्याने बराच वेळ गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित रुग्णालयात पुरेसे डॉक्टर आणि कर्मचारी नसून रुग्णालयाची नवी सुपर स्पेशालिटी इमारत उभी असून देखील सुरु करण्यात आलेली नसल्याने याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) श्री. अविनाश शिरगावकर नामक रुग्ण दि.०७.०४.२०२५ रोजी (पहाटे ०५:०० am ते ५:३० am च्या दरम्यान) पं. मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालय येथे कॅज्युअल्टी विभागात आले होते. अपघात विभागात रुग्णावर प्राथमिक स्वरुपाचे उपचार करण्यात आले व रुग्णास सकाळी सर्जरी ओपीडीला येऊन दाखवावे असे सांगण्यात आले.

(३) हे खरे नाही.

७ एप्रिल २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता श्री. शिरगावकर यांना लघवी करण्यास असमर्थता आणि खालच्या ओटीपोटात दुखणे यामुळे त्यांना शताब्दी गोवंडी येथून संदर्भित करण्यात आले होते. उपचारादरम्यान रात्री ११.०० वाजता रुग्णाची प्रकृती खालावली. दि.८ एप्रिल २०२५ रोजी पहाटे २.३० वाजता मृत घोषित करण्यात आले.

(४) पं.मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयात डॉक्टरांचे रिक्त पद भरण्याकरिता प्रशासकिय मंजुरी घेऊन सदर पदांची जाहिरात प्रसिध्द करून पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

सद्य:स्थितीत पं.मदन मोहन मालवीय शताब्दी रुग्णालयाच्या नवीन इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिकेत (जि.पालघर) निविदा प्रक्रियेत होत असलेला गैरप्रकार

**(३१)** * **७८४२ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहर महानगरपालिकेच्या प्रक्रियेमध्ये निविदा प्राप्त झाल्यानंतर काही ठेकेदार यांनी संगनमताने जास्त दराने निविदा मंजूर होण्यासाठी आपली निविदा मागे घेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे महानगरपालिकेचे नुकसान होत असून अशा ठेकेदारांना काळया यादीत टाकण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शानास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित जबाबदार ठेकेदांरावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) निविदेतून माघार घेणाऱ्या तसेच अपुरे कागदपत्र सादर करणाऱ्या ठेकेदारांची इसारा रक्कम जप्त करण्यात येते.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दिनांक २८.०९.२००६ अन्वये कंत्राटदारांवर दंडात्मक कार्यवाही करण्याच्या कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असून, त्यानूसार कार्यवाही करण्याच्या सूचना वसई विरार शहर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील संरक्षित क्षेत्रातील खारफूटीवर भराव टाकून अतिक्रमण केल्याबाबत

**(३२) * ८१३८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत बऱ्याच परिसरात पर्यावरण कायद्याचे उल्लघंन करुन खारफुटीच्या संरक्षित क्षेत्रात अतिक्रमण करुन त्यावर मोठ्या प्रमाणात भराव टाकुन खारफुटी नष्ट केल्याप्रकरणी ट्रॉम्बे,अंधेरी (प.),बोरिवली,दहीसरसह विविध पोलिस ठाण्यात सहा गुन्हे दाखल करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,ट्रॉम्बेच्या चिता कॅम्प परिसरातील संरक्षित जागेत भराव टाकुन ग्लोरिया नावाच्या शाळेचे बांधकाम केल्याप्रकरणी ट्रॉम्बे पोलिसात गुन्हा दाखल केला असून सांताक्रुझ (पश्चिम) महानगरपालिकेच्या जलशुध्दीकरण प्रकल्पासमोरील संरक्षित जागेत पाळीव प्राण्यासाठी बेकायदा आठ शेडचे बांधकाम करणे,यासह सहा ठिकाणी बेकायदा बांधकामे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबधित दोषींविरुद्ध कारवाई करुन व अतिक्रमित बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे बोरीवली (प.) येथील महानगरपालिका कार्यालयामार्फत कांदळवन क्षेत्रात अनधिकृत भरणी केल्याबद्दल एच.बी.कॉलनी पोलीस स्टेशन येथे प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सांताक्रुझ पश्चिम येथील मलनि:सारण प्रकल्पासमोरील जागा महसूल विभागाच्या अखत्यारितील असून तेथील अनाधिकृत बांधकामावर उपजिल्हाधिकारी अतिक्रमण निर्मूलन यांचेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्प रद्द करण्याबाबत

**(३३) * १३०५५ श्री.आदित्य ठाकरे (वरळी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनील राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील रिव्हर फ्रंट डेव्हलपमेंट प्रकल्पामुळे नद्यांचे पात्र अरुंद होऊन पुराचे पाणी शहरातील वस्त्यांमध्ये शिरत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्षेत्रातील ११ मंदिरे व ४ रस्ते या प्रकल्पामुळे पाण्याखाली जाण्याची स्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरण तज्ञांनी सदरहू प्रकल्प पर्यावरणास घातक असल्याने तात्काळ रद्द करण्याबाबत शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदरहू प्रकल्प रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

तथापि काही नागरिकांनी महानगरपालिकेकडे याबाबत पत्र दाखल केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोलापूर शहरातील एमआयडीसी मध्ये लागलेल्या आगीमुळे झालेली जीवित व वित्त हानी

**(३४) * ९१४२ श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहरात दरवर्षी सरासरी आगीच्या १० घटना घडत असून त्या विझविण्यासाठी सोलापूर महानगरपालिकेच्या अखत्यारित लोकसंखेच्या सरासरीनुसार १० अग्निशामक केंद्राची आवश्यकता असताना केवळ ५ अग्निशमन केंद्रे असल्याचे माहे एप्रिल २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी हद्दीतील सेंट्रल टॉवेल कारखाना येथे शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याने ८ लोकांना आपले जीव गमवावे लागले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारखान्यास लागलेली आग तब्बल १० तास सुरु असतानाही अग्निशमन केंद्रात वाहनांची कमतरता असल्याने जिल्ह्यातील ४ तालुक्यांमधून अग्निशामक वाहन आग विझविण्यासाठी मागविण्यात आल्याने अग्निशमनाचे बंब वेळेत न पोहोचल्यामुळे मोठी जीवितहानी होऊन लाखोंचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अग्निशमन केंद्रांची संख्या वाढवण्याबाबत तसेच अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांची संख्याही वाढवण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच सोलापूर शहरात भविष्यात आग लागुन होणारी जीवित व वित्त हानी टाळण्याच्यादृष्टिने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय अहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

सोलापूर महानगरपालिकेच्या अग्निशामक विभागाची एकूण ०८ अग्निशामक वाहने घटनास्थळी उपस्थित होती. आगीचे स्वरुप पाहता पंढरपूर नगरपरिषद, अक्कलकोट नगरपरिषद, एनटीपीसी व चिंचोळी एमआयडीसी यांच्याकडून अग्निशमन वाहने मागविण्यात आली होती. सदर वाहने वेळेत घटनास्थळी पोहचली होती. तथापि, इमारतीच्या सामासिक अंतरात असणारे अवैध बांधकाम, शेड व त्यात साठविलेला कच्चा व पक्का माल यामुळे आग विझवताना अडचणींना सामोरे जावे लागले आहे.

सदरच्या कारखान्यामध्ये यार्न, कच्चा व पक्का माल, लुम मशिन, रंगासाठी वापरण्यात येणारे पदार्थ यासारखे ज्वलनशील पदार्थ मोठ्या प्रमाणात असल्यामुळे आग वेगाने पसरली व लाखोंचे नुकसान झाले.

(४) सोलापूर महानगरपालिकेमार्फत अक्कलकोट रोड, एमआयडीसी येथे अग्निशामक केंद्र बांधण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. तसेच देगांव येथे नवीन अग्निशामक केंद्र प्रस्तावित आहे. सन २०२४ मध्ये अग्निशामक विभागामध्ये २४ फायरमनची नव्याने पदभरती करण्यात आली आहे. अग्निशामक विभागाकरिता लागणारे अत्याधुनिक साहित्य खरेदीसाठी जिल्हास्तरावरील अग्निशमन व आणीबाणी सेवांचे बळकटीकरण या योजनेअंतर्गत रु.४.०० कोटी इतक्या रक्कमेचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिरा-भाईंदर महानगरपालिकेने (जि.ठाणे) शहरातील विविध कामांच्या काढलेल्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(३५) * ११११० श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मिरा-भाईंदर महानगरपालिकेने (जि.ठाणे) शहरातील मैदाने, उद्याने, दुभाजक, स्मशानांची देखभाल, दुरुस्तीसाठी दिनांक १२ एप्रिल, २०२१ रोजी काढलेल्या २६ कोटी ५८ लाख ९६ हजार ४०३ रुपयांच्या निविदेला तांत्रिक मान्यता न घेता बेकायदा निविदा काढून कंत्राटदाराची नियुक्ती केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंत्राटदाराला १ वर्षाची नियमबाह्य मुदतवाढ देऊन ३५ कोटीं रुपयांची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहासंदर्भात सखोल चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच ठेकेदाराला अदा करण्यात आलेल्या सर्व देयकांची वसूली करण्यात यावी अशी मागणी माजी नगरसेवकांनी आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांचेकडे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन देयकांच्या वसुलीसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अशा आशयाच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या, हे खरे आहे.

(४) मिरा-भाईंदर शहरातील उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके येथील साफसफाई , पाणी देणे, छाटणी करणे व कचरा उचलणे ही दैनंदिन निगा देखभाल कामे करणे या निविदेचा २ वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी सदर कामाची नवीन निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. परंतु, निविदेस प्रतिसाद मिळत नसल्याने निविदा प्रक्रियेस उशीर झाला होता. परंतु, नवीन निविदा मंजूर होईपर्यंत उद्याने, मैदाने, स्मशाने व दुभाजके येथील दैनंदिन निगा देखभाल कामे करणे आवश्यक होते. तसेच सुरू असलेल्या निगा व देखभाल कामामधील मोजमापामध्ये (क्षेत्रफळ) कोणताही बदल नसल्याने व नवीन निविदा मंजूर होऊन कार्यादेश देण्याचा कालावधी निश्चित नसल्याने अंदाजपत्रक तयार करणे शक्य नव्हते. त्यामुळे मागील कंत्राटदार यांना मुदतवाढ देण्याचा निर्णय महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला, ही वस्तुस्थिती आहे.

- सदर कामाची मूळ निविदा रक्कम रू. २६,३२,६३,६७३/- इतकी असून, दि.१२.०४.२०२१ रोजी कार्यादेश दिल्यापासून दि.११.०४.२०२३ पर्यंत या २ वर्षाच्या कालावधीपर्यंत रू. २२,७९,३७,९४२/- व तद्नंतर मुदतवाढीमध्ये (मुदतवाढ १ वर्ष) रू. ११,२८,०१,०२५/- असे एकूण रू. ३४,०७,३८,९३७/- इतका खर्च झालेला आहे.
- सदर बाबीस प्रशासकीय ठराव क्र. ५४, दि.१८.०५.२०२३ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार देयके अदा करण्यात आलेली आहेत. तसेच, निविदेचा कालावधी दि.१३.०३.२०२३ रोजी संपुष्टाल आलेला आहे.
- प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणाची वस्तुस्थिती लोकप्रतिनिधी व माजी नगरसेवक यांना महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) येथे पंतप्रधान आवास योजनेतून बांधण्यात येणाऱ्या घरांचा प्रकल्प विकासकाने वेळेत पूर्ण न केल्याबाबत

**(३६) * ८८७७ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर (जि.ठाणे) येथे पंतप्रधान आवास योजनेतून बांधण्यात येणाऱ्या २ हजार २९८ घरांचा प्रकल्प विकासकाने वेळेत पूर्ण न केल्यामुळे सदर कामासाठीचा २५५ कोटी रुपयांचा खर्च ४३४ कोटीवर गेल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३२५ चौ.फूट क्षेत्रफळाचे घर ११ लाख २० हजार रुपयात देण्याचे मान्य केले असतांना आता त्या घरासाठी नागरीकांकडून १७ लाख ५० हजार रुपये घेण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त घरांचा खर्च वाढल्यामुळे सर्वसामान्य गरीब नागरीकांना या योजनेतून घरे घेणे परवडत नसल्याने सदर योजना अयशस्वी ठरली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर घरांच्या किंमती वाढविण्याची कारणे काय आहेत, तसेच या प्रकरणी चौकशी करुन विहित कालावधीत योजना पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत बदलापूर येथील २,२९८ घरांच्या प्रकल्पांची किंमत सन २०१९ मध्ये २५५ कोटी इतकी होती. सदर प्रकल्पांची किंमत सन २०२४ मध्ये रुपये ४२६ कोटी इतकी झाली आहे.
(२) सदर प्रकल्प मंजूर करतांना AHP घटकांतर्गत १८३६ घरकुलांची किंमत रुपये ११.२० लाख प्रति घरकुल इतकी होती. दिनांक १३.०६.२०२४ रोजीच्या शासनपत्रान्वये सदर घरकुलांची किंमत रुपये २० लक्ष प्रति घरकुल इतकी सुधारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(३) सदर प्रकल्पातील AHP घटकांतील १२९८ घरांचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून, सदर घरांची सोडत काढण्यासाठी मे. प्रोबिटी सॉफ्टवेअर प्रा. लि. या संस्थेची नेमणूक करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) कोरोना-१९, बांधकाम साहित्यात झालेली वाढ व सेवा करातील वाढ इत्यादी बाबींमुळे घरांच्या किंमतीत वाढ झाली आहे. तसेच सदर प्रकल्प पूर्ण करण्यासाठी म्हाडा प्राधिकरणामार्फत पाठपुरावा सुरु आहे.

-----------------

**बीड जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई व जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बीड यांनी रस्त्याच्या कामांना नियमबाह्य प्रशासकीय मान्यता दिल्याबाबत**

**(३७) * ८७१२ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई व जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक ०२ बीड या यंत्रणेद्वारे एकाच रस्त्याचे विभाजन करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येकी १० लक्ष रुपये किंमतीच्या कामांना नियमबाह्य प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे नेमण्यात आलेल्या चौकशी समितीच्या निर्दशनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार उक्त कामांना नियमबाह्य प्रशासकीय मान्यता देणा-या संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत?

**श्री. अजित पवार :** (१) व (२) बीड जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई व जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक ०२ बीड या यंत्रणांद्वारे प्रशासकीय मान्यता देताना एकाच रस्त्याच्या चेनेजमधील तुकड्यानुसार प्रशासकीय मान्यता दिल्याचे आढळून आले आहे असे विशेष चौकशी पथकाच्या अहवालात नमूद आहे. तथापि, त्यामध्ये रस्त्याच्या कामाच्या किंमतीबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही.

विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक १७/०६/२०२५ च्या पत्रान्वये चौकशी पथकाच्या अहवालातील बाबींच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत नागरी सुविधांबाबतच्या तक्रारींमध्ये वाढ झाल्याबाबत

**(३८) * १२६०७ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेअंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, पाणी, शाळा, रस्ते, शौचालय या नागरी सुविधांबाबतच्या तक्रारींमध्ये गत १० वर्षांत ७० % वाढ झाल्याचे नुकत्याच प्रकाशित झालेल्या "मुंबईतील नागरी सुविधांची सद्य:स्थिती" या अहवालातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२४ या वर्षात मुंबईतील नागरिकांनी एक लाखांच्यावर तक्रारी केल्या असून प्रदूषण, शौचालय, घनकचरा संबंधी तक्रारीत ३०० टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्वच्छ भारत अभियानाच्या मापदंडानुसार एका शौचालयाचा वापर ३५ पुरुष व स्त्री शौचालयाचा वापर २५ स्त्रिया याप्रमाणात अपेक्षित असताना मुंबईत सार्वजनिक शौचालयाचा वापर ८६ पुरुष तर ८१ स्त्रिया करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच मुंबईला दररोज ४३७० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असून पाणी गळतीमुळे प्रत्यक्षात ३९७५ दशलक्ष लिटरच पाणी उपलब्ध होत असून झोपडपट्ट्यांमध्ये दरडोई केवळ ४५ लीटर पाणी उपलब्ध होत असल्यामुळे त्यांना उर्वरित पाण्यासाठी दरमहा ७५० रुपये खर्च करून टँकरवर अवलंबून रहावे लागते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई महानगरपालिकेत मागील तीन वर्षापासून नागरी सुविधा व समस्यांची जबाबदारी प्रशासकावर असल्यामुळे तसेच त्यांच्याकडे असलेल्या इतर कामांमुळे नागरी समस्यांकडे त्यांचे दुर्लक्ष होत असल्याने नागरी सोयी सुविधासंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) प्रजा फाउंडेशन या अशासकिय संस्थेच्या वतीने "मुंबईतील नागरी सुविधांची सद्य:स्थिती" या मे, २०२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, पाणी, शाळा, रस्ते, शौचालय या नागरी सुविधांबाबतच्या तक्रारींमध्ये सन २०१५ ते सन २०२४ या कालावधीत ७० % वाढ झाली असल्याचे नमुद केले आहे.

(२) या अहवालानुसार सन २०२४ मध्ये १,१५,३९६ इतक्या तक्रारी प्राप्त झाल्या असून प्रदूषण, शौचालय व घनकचरा संबंधीत तक्रारीमध्ये सन २०१५ च्या तुलनेत अनुक्रमे ३३४ टक्के, २१८ टक्के व ३८० टक्के इतकी वाढ झाल्याचे दर्शविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

मुबंईमध्ये एकूण १०६८४ इतकी सार्वजनिक शौचालये असून त्यामध्ये एकूण १,५९,०३६ इतक्या शौचकुपे आहेत. मुंबईत ४६ पुरूष व ३८ महिला यांच्यासाठी प्रत्येकी १ शौचकुपे उपलब्ध आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

सद्यस्थितीत मुंबई शहरास दररोज ४००० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा होत असून झोपटपट्टीमधील रहीवाश्यांना होणारा पाणीपुरवठा दरडोई ४५ लिटर इतका असून भारतीय मानक ब्युरो संस्थेच्या संहिता ११७३-१९९३ मधील कलम क्र.४.१ नुसार आवश्यक असणाऱ्या दरडोई ४० लिटर पेक्षा जास्त आहे.

(५) मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासकाकडून नागरी समस्यांकडे दूर्लक्ष होत नसून नागरी सोयीसुविधा मानकांनुसार उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याशिवाय विविध माध्यमांद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रारींची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नोंद घेवून स्थळ पाहणी करुन सदर तक्रारींचे त्यांच्या स्वरूपानुसार २४ ते ७२ तासांमध्ये निवारण करण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बीड येथे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या विकास कामांची चौकशी करण्याबाबत**

**(३९) * ९३२१ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड क्षेत्रातील सन २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीत कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक १ व २ येथे मोठ्या प्रमाणात विकासकामे करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास कामे करण्यासाठी मे. गुरुमाऊली कंस्ट्रक्शन कंपनी बीड व मे. डी.बी कंस्ट्रक्शन नेरुळ, नवी मुंबई यांनी ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये चुकिची माहिती देऊन या निविदा प्राप्त केल्या असुन त्यांनी केलेली विकासकामे अतिशय निकृष्ट दर्जाची केलेली असुन या कामात त्यांनी गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामाचा दर्जा तपासण्यासाठी त्रयस्त समिती अथवा दक्षता यांना गुणनियंत्रण विभागाकडे वर्ग करण्यात आले , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त कंत्राटदारांने बनावट कागदपत्राच्या आधारे जी कामे केलेली आहेत त्याची सविस्तर चौकशी करुन या कंत्राटदारांना काळया यादीत टाकण्यात यावे, अशी तक्रार तेथील लोकप्रतिनिधींनी अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक २१ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मे. गुरुमाऊली कंस्ट्रक्शन कंपनी, बीड व मे. डी.बी कंस्ट्रक्शन नेरुळ, नवी मुंबई यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

मे.गुरुमाऊली कंस्ट्रक्शन कंपनी बीड ची दोन कामांपैकी एक काम मानकाप्रमाणे पूर्ण झाले आहे. तसेच एक काम प्रगतीत आहे. ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये अभिलेखे तपासूनच निविदा मान्य केल्या आहेत. तसेच कंत्राटदाराकडून कोणतेही काम निकृष्ठ दर्जाचे करण्यात आलेले नाही.

(३) मे.गुरुमाऊली कंस्ट्रक्शनच्या एका कामाची चौकशी करण्यासाठी अधीक्षक अभियंता, धाराशीव यांनी समिती स्थापन केली असून अद्याप अहवाल अप्राप्त आहे. तसेच मे.डी.बी.कंस्ट्रक्शनने सन २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये कोणतेही काम या विभागात केलेले नाही.

(४) होय, सदर तक्रार अहवालासाठी क्षेत्रीय कार्यालयास पाठविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पाथरी (जि. परभणी) येथील दर्जाहिन विद्युत खांब उभारण्याबाबत**

**(४०) * ९९८९ श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि. परभणी) येथील जिल्हा वार्षिक योजनेतील निधीमधून उभारण्यात येणाऱ्या विदयुत खांबाच्या कामात फसवणूक, गुण नियंत्रण चाचणी व दर्जाहीन उभारणी केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल- मे, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्याच पावसात खांब पडल्याने जिल्हाधिकारी परभणी यांनी त्या कामाची गुण नियंत्रण विभाग व तांत्रिक तपासणी केली आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी इलेक्ट्रिक कंपनी व मुख्याधिकारी व इतर कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे,

मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.२१ एप्रिल, २०२५ रोजीच्या पत्रान्वये अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे केली आहे.

(२) व (३) मा.लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन कामांचे गुणनियंत्रण व तांत्रिक तपासणी करण्याकरीता जिल्हाधिकारी, परभणी यांच्या दि.०६ मे, २०२५ रोजीच्या आदेशान्वये उपअभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर चौकशी समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मानखुर्द (मुंबई) येथील शिवाजीनगर येथे कुर्ला स्क्रॅप या भूखंडाच्या अतिरिक्त जागेवर झालेले अतिक्रमण

**(४१) * ९३०२ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर मंडाळामधील मानखुर्द (मुंबई) येथील कुर्ला स्क्रॅप या भूखंडाचा करार सन २००६ मध्येच संपुष्टात आला असून सदर भूखंड हा कराराने दिलेल्या भूखंडापेक्षा अतिरिक्त जागेवर ताबा करून अतिक्रमण केला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागेत साबण व इतर केमिकलयुक्त कारखाने सुरु असल्याने मोठया प्रमाणात आग लागण्याच्या घटना घडत असून, याबाबत नागरिकांकडून वांरवार तक्रार करूनही संबंधिताविरुध्द कोणतीच कारवाई करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे, खरे नाही.

(३) याबाबत उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण व निष्कासन) यांचेकडून दि.१६.१०.२०२४, दि.१३.०१.२०२५ व दि.०३.०४.२०२५ रोजी स्थळ पाहणी करण्यात आली आहे. तसेच, अनधिकृत कारखान्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून मनपा अधिनियम कलम ३९० व ३९४ अन्वये स्थळपाहणी करून सदर कारखान्यांवर मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात येतो व दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील अनधिकृत ले-आऊट बाबत

**(४२) * १३०४७ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील शासकीय नियमांचे उल्लघंन करुन दिग्रस नगरपरिषद व महसूल प्रशासनातील काही अधिकारी व कर्मचा-यांशी संगनमत करून अनधिकृत ले आऊट बांधण्यात आले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविक नदीकाठच्या भागामध्ये तसेच ग्रीन झोनमध्येही ले-आऊट बांधण्यास मंजुरी नसतानाही सदर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृतपणे बांधकाम करणाऱ्या संबंधित जबाबदार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) वणी नगर परिषद हद्दीमध्ये सन २०२५ मध्ये वा त्यापुर्वी कोणतेही रहिवासी रेखांकन नदीकाठच्या भागामध्ये व शेती विभागाच्या क्षेत्रामध्ये (ग्रीन झोन) नगर परिषदेद्वारे मंजुर करण्यात आलेले नाही. माहे मे, २०२५ मध्ये काही व्यक्ती नगरपरिषद वणी हद्दीमध्ये विनापरवाना विकास कामे करून अनधिकृतपणे भुखंडाचे तुकडे करून विक्री करित असल्याबाबत नगरपरिषद कार्यालयाच्या निर्दशनास आले. त्यानुषंगाने नगरपरिषद कार्यालयाकडून याबाबत संबंधिताना दि.०६.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये नोटिस बजावण्यात आलेली आहे.

(३) नगर परिषद वणी कार्यालयाकडून संबंधिताना नोटिस बजावण्यात येऊन अनधिकृत सुरू असलेली विकास कामे त्वरित थांबविण्यात आली आहेत व या नोटिसींची प्रत जिल्हाधिकारी, यवतमाळ, सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ, उपविभागीय अधिकारी, वणी, उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी, तहसिलदार, वणी, मा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन वणी, दुय्यम निबंधक, वणी यांना माहिती व कार्यवाही करिता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर महानगरपालिका (जि.ठाणे) येथील धोकायदायक इमारती असल्याबाबत

**(४३) * ७४७४ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारतींचे माहे मे, २०२५ मध्ये केलेल्या संरचनात्मक लेखापरिक्षणामध्ये २६३ इमारती धोकायदायक असल्याची बाब दिनांक २० मे,२०२५ रोजी निदर्शानास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारती कधीही कोसळण्याचा धोका असून या इमारतीमधील रहिवाशांयासाठी कायमस्वरूपी निवारा केंद्र बांधावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उल्हासनगर महानगरपालिकेकडे दिनांक ३ ० एप्रिल ,२०२५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, १ ५ व्या वित्त आयोगाने महाराष्ट्र राज्य आपत्ती सौम्यीकरण (State Dissaster Mitigation Fund, SDMF) अंतर्गत प्रकल्प मुल्यमापन समिती व तांत्रिक मुल्यमापन समिती ने शिफारस केलेल्या तसेच दिनांक १३ऑगस्ट,२०२४ रोजीच्या राज्य आपत्ती प्राधीकरणाच्या बैठकीमध्ये उल्हासनगर शहराकरीता तेजुमल चक्की येथे बेघर निवारा केंद्र रु.३.०० कोटी (G+१) व वाल्मीकीनगर येथे संक्रमण शिबीर बांधण्याकरीता (G+६) रु.२०.००कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मे. ब्रेथलेट अँड कंपनी या कंपनीला दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी कामाचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले असून महानगपालिकेकडून रेखांकन करण्याचे काम अद्यापही करण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वाल्मीकीनगर येथे संक्रमण शिबीर बांधण्याकरीता निधी मंजूर करण्यात येऊन मान्यता मिळाली असतानाही सदर काम तांत्रिक मान्यतेकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आले आहे व कामाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेकरीता सादर केला असून अदयाप यास मान्यता मिळाली नसल्याचे निदर्शानास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार गेल्या दोन वर्षात महानगपालिकेच्या वतीने उक्त रेखांकन करण्याचे काम करण्यात आले नाही याची चौकशी करण्यासह वाल्मीकीनगर येथे संक्रमण शिबीर बांधण्याच्या कामास मान्यता मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि. ०९ मे, २०२५ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेव्दारे प्रसिध्द यादीप्रमाणे शहरात एकूण २६३ इमारती ह्या धोकादायक घोषित करण्यात आलेल्या आहेत.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि.३० एप्रिल, २०२५ रोजीचे निवेदन उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे. तथापि, सदर निवेदन हे शहरातील पाडकाम करण्यात आलेल्या धोकादायक व जुनाट इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांकरीता संक्रमण शिबिराची व त्याठिकाणी मूलभूत सुविधा यांची व्यवस्था करणेसंदर्भात असल्याचे आढळून आले.

(३) हे खरे आहे.

(४) हे अंशत: खरे आहे.

तेजुमल चक्की येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र उभारण्याकरीता ब्रेथलेट अँड कंपनीला दि.०३ जानेवारी, २०२५ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला असून ब्रेथलेट अँड कंपनी यांचेसमवेत संयुक्त पाहणी करून रेखांकनाची कार्यवाही उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

(५) राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या दि.०४ जून, २०२५ रोजीच्या बैठकीमध्ये उल्हासनगर शहराकरीता वाल्मीकीनगर येथील एक बहुउद्देशीय निवारा केंद्राचा प्रस्ताव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई विरार (जि. पालघर) शहर महानगरपालिका क्षेत्रात विकासकांनी बनावट कागदपत्रे तयार करून अनधिकृत बांधकामांद्वारे नागरिकांची केलेली फसवणूक

**(४४) * ७१९८ श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई विरार (जि.पालघर) शहर महानगरपालिका क्षेत्रात अनेक भुमाफीया विकासकांनी बांधकामासाठी लागणाऱ्या आवश्यक परवानग्या मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रे सादर करून केलेल्या अनधिकृत बांधकामांव्दारे नागरिकांची फसवणूक केल्याचे उघडकीस आल्याने विरार पोलिस ठाण्यात संबंधित विकासकाविरूध्द एफ.आय.आर.क्र.१) ९३२/२०१८ क्र.२) १७/२०१९ क्र.३) ४००/२०१९ अन्वये गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकांने बनावट कागदपत्रांमुळे स्वत:चीच फसवणूक झाल्याचा देखावा निर्माण करून स्वत: फिर्याद देत मुळ गुन्हयातून वाचण्याचा प्रयत्न पोलिसांच्या संगनमताने केला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, याप्रकरणी दोषी आरोपी असलेल्या विकासकावर गुन्हा नोंद होणे अपेक्षित असतांना पोलिसांनी खोटया आरोपीवर गुन्हा दाखल करून मुळ आरोपीस वाचविण्याचा प्रयत्न करित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोंषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे : (**१) खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

श्री. राजेश अमृतलाल शहा यांनी श्री.आशीष भिकाजी सोलंकी, श्री.संतोष बाबाजी सपकाळ, श्री.पंकज जगूभाई शाह, श्री.अविनाश हरिश्चंद्र वर्तक यांच्याविरुध्द गुन्हा क्र. ९३२/२०१८ नोंद केला आहे.

श्री. अमोल रविंद्र पाटील यांनी श्री.संतोष बाबाजी सपकाळ, श्री.अविनाश हरिश्चंद्र वर्तक यांच्याविरुध्द गुन्हा क्र. १७/२०१९ नोंद केला आहे.

श्री. अजय गिरीधर पाटील यांनी श्री. राजेश वसंत नगरकर यांच्याविरुध्द गुन्हा क्र. ४००/२०१९ नोंद केला आहे.

(४) वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत दुय्यम निबंधक कार्यालयांचे बनावट शिक्के, सिडको व नगररचना कार्यालयाचे बनावट शिक्के, लेटरहेड व बनावट करारनामे वापरुन ७८ इतक्या अनधिकृत इमारती बांधले प्रकरणी ३८ गुन्हे संबधित अनधिकृत बांधकाम व्यावसायिकांविरुद्ध दाखल करण्यात आलेले आहेत. पुढील कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेने विकासकामे, खरेद, पदोन्नाती, परवाना वितरण, व ठेकेदार निविदांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(४५) * ७४४० श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत गेल्या तीन वर्षांपासून प्रशासक असल्याने या कालावधीत विकासकामे, खरेदी, पदोन्नती, परवाना वितरण, व ठेकेदार निविदांमध्ये विविध प्रकारचे गैरव्यवहार झाले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासक कालावधीत डांबर खरेदीतील १२६ कोटींच्या निविदा प्रक्रियेतील अनियमिततेबाबत चौकशी करण्याची बाब पुन्हा त्या विभागाकडेच सोपविल्याचे निदर्शनास आले असून यासंदर्भात पारदर्शक चौकशीसाठी स्वतंत्र यंत्रणा नियुक्त करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय आहे,

(३) असल्यास, सुरक्षारक्षक पुरवणाऱ्या ठेकेदाराने मुंबई महानगरपालिकेतील २०० सुरक्षारक्षकांच्या नावावर पुणे महानगरपालिकेकडून पगार उचलल्याचे, तसेच कंपनीवर गुन्हा नोंदविण्यात न आल्याचे प्रकरण निदर्शानास आले झाले आहे. या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंगात्मक कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) तसेच महानगरपालिकेतील अभियंत्यांच्या बदल्या व पदोन्नतीमध्ये तसेच शालेय साहित्य खरेदीसाठी ४ कोटी रुपयांची मंजूर खरेदी, दक्षता विभागाच्या शिफारशीविरोधात करण्यात आली असून बांधकाम व्यावसायिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेने कलम २०५ अंतर्गत विकास आराखडयात ८ रस्त्यांचे प्रस्ताव नसताना देखील मंजूर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नालेसफाईच्या निविदा ५०–५५ टक्के कमी दराने मंजूर केल्याने गुणवत्ता आणि कामाच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न चिन्ह उपस्थित झाले आहेत. यासंबंधी पुर्नतपासणी किंवा पुनर्निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अंशत: खरे आहे.

प्रकरणी संबंधित ठेकेदारास काळ्या यादीत टाकणे बाबत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी असा आदेश देण्यात आला असून त्यानुसार र.रु.५८.२७ लाखाचा दंड वसूल करण्यात आला आहे. नवीन निविदा १/२०२५ च्या प्रक्रियेमध्ये मे.इगल सिक्युरिटी अँड पर्सनल सर्विसेस कंपनीने सहभाग नोंदविला नाही.

(४) शालेय साहित्य खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सर्व आवश्यक समित्यांची मान्यता घेऊन पूर्ण करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत ८ रस्त्यांचे ठिकाण (सर्वे नं. व गाव) तसेच रस्ता आखणीचे वर्ष कळल्यास त्याबाबत माहिती उपलब्ध करून देणे शक्य होईल.

(५) ठेकेदाराने कमी दराने निविदा भरल्या असल्या तरी सदरची कामे ही टेंडर अटी शर्तीनुसार पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पुनर्तपासणी किंवा पुनर्निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आलेली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मालाड, वडाळा व सायन येथे डेब्रिज भरणा करुन शासकिय जागा अतिक्रमित केल्याबाबत

**(४६) * ११५५८ श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सायन प्रतिक्षानगर येथील पर्यावरण व सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करुन हजारो कांदळवन नष्ट करुन, संपूर्ण खाडी भाग भराव टाकून बुजवून टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास,खाजगी विकासकाच्या माध्यमातून शास्त्री नगर येथील अतिक्रमित जागेत स्थानिक समाजकंटक व राजकीय नेते तसेच प्रशासकीय अधिकारी यांच्या आर्थिक संगनमताने बेकायदेशीररित्या झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यात येत असल्याचे दिनांक २९ मे,२०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शानास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी प्रथम अतिक्रमित जागेत झोपड्या वसवून तद्नंतर त्याची बेकायदा विक्री करुन आर्थिक घोटाळा करण्यात येणे, तसेच एसआरए प्रकल्पासाठी मुंबई महानगरपालिकेची ड्रेनेज लाईन तोडून अनाधिकृतपणे रस्त्याचे बांधकाम करण्यात आले आहे, हे ही खरे आह काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध कारवाई करुन अतिक्रमित जागा शासनाच्या ताब्यात घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) सदर क्षेत्रात कुठेही कांदळवन वृक्ष दिसून आले नाही. तसेच, कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले नाही. तसेच, MRSAC चे २००५ व IIIST कडील २०१८ चे नकाशानुसार क्षेत्र तपासणी अंती, सदर क्षेत्र हे सॉल्टपॅन, नं.भू. क्र. ६ पै कांदळवन क्षेत्रापासून ५० मी बफर झोन क्षेत्राच्या बाहेर आहे.
(२) हे खरे नाही.
भू.क्र. ४ (भाग) व ७ (भाग), सॉल्ट पॅन विभाग मुंबई या महाराष्ट्र शासनाच्या मालकीच्या जमिनीवरील शास्त्री नगर नावाने ओळखल्या जाणाऱ्या गणनाकृत झोपडपट्टी वसाहतीमधील शास्त्री नगर (सायन) सह. गृह. संस्था (नियो.), जय भवानी अजिंक्यतारा सह. गृह. संस्था (नियो.) व अष्टविनायक एस. आर.ए. सह. गृह. संस्था (नियो.) या गृहनिर्माण संस्थांचा पुनर्विकास करण्याकरिता विकासक म्हणून
मे. रेनिसन्स स्पेसेस व वास्तुविशारद म्हणून मे. कॅटापुल्ट रिएल्टी कन्सलटंट यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदरची झोपडपट्टी पुनर्वसन योजना दिनांक १३.०६.२०१६ रोजी स्विकृत करण्यात आलेली आहे. सदर योजनेचा पुनर्विकास विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०३४ मधील नियम
क्र. ३३ (१०) अंतर्गत करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.
सदर ठिकाणामधून महानगर पालिकेची कुठलीही ड्रेनेज लाईन जात नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### शहापूर (जि.ठाणे) येथे महामंडळाला दिलेल्या भाताचे पैसे शेतकऱ्यांना मिळाले नसल्याबाबत

**(४७) * ९५६३ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर (जि.ठाणे) उपप्रादेशिक अंतर्गत मुगाव आदिवासी, सावरोली, चोंढे, आटगाव, सापगाव, पिवळी खोर या खरेदी केंद्रांमार्फत २०२४-२५ मध्ये खरीप हंगामात एकूण १२ हजार ३०० शेतकऱ्यांनी प्रत्यक्षात ऑनलाईन भात नोंदणी केली असून यापैकी ३६०० शेतकऱ्यांकडून ८५ हजार क्विंटल इतक्या भाताची खरेदी करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी २५ टक्के शेतकऱ्यांनाच प्रत्यक्षात भाताचे पैसे मिळालेले असून उर्वरित ७५ टक्के शेतकरी आजही अनेक महिन्यांपासून महामंडळाला दिलेल्या भाताचे पैसे मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच आदिवासी विकास महामंडळाच्या संचालिका यांनी, पीक पेरा नोंदवणे ही बाब महसूलशी संबंधित असून ज्या शेतकऱ्यांनी आपला भात महामंडळाला दिला असून अशा शेतकऱ्यांनी आपली कागदपत्रे वेळीच भाताचे पैसे मिळण्याबाबत शहापूर उपप्रादेशिक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे सादर करावी असे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांनी महामंडळाच्या खरेदी केंद्रावर ऑनलाईन नोंदणी केलेली असतांना महामंडळाच्या संचालिका यांचे म्हणणे समर्थनिय नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पैसा अभावी शेतकऱ्यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांची परतफेड कशी करायची असा प्रश्न त्यांचे पुढे निर्माण झाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन उर्वरित ७५ टक्के शेतकऱ्यांचे त्यांचे पैसे देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. छगन भुजबळ :** (१) अंशतः खरे आहे.

खरीप पणन हंगाम २०२४-२५ मध्ये ठाणे जिल्ह्यातील शहापुर तालुक्यामध्ये मुगाव आदिवासी, सावरोली, चोंढे, आटगाव, सापगाव, पिवळी खोर या खरेदी केंद्रांवर एकुण ८७४६ शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आलेली असून त्यापैकी ३६१० शेतकऱ्यांकडून ८३९८१.५६ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.
(२) धान विक्री केलेल्या एकुण ३६१० शेतक-यांपैकी सुमारे ८३% (३००३) शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्यात आलेले आहेत. उर्वरित शेतकऱ्यांचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) अंशतः खरे आहे.
(५) अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त नाहीत.
(६) सुमारे ८३ % शेतक-यांचे (३००३) चुकारे अदा करण्यात आले असुन उर्वरीत शेतक-यांचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**मुंबईतील भारतनगर वांद्रे (पुर्व) येथे बोगस गृहनिर्माण संस्था स्थापन करुन करण्यात आलेला गैरव्यवहार**

**(४८) * ११७८९ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व ) येथे भारतनगर, के.जी.एन सहकारी गृहनिर्माण संस्था (प्रस्तावित) या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार व नियमबाहय काम होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबईतील भारतनगर, वांद्रे (पूर्व) येथील के.जी.एन सहकारी गृहनिर्माण संस्था (प्रस्तावित) या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत मोठया प्रमाणात गैरव्यवहार व नियमबाह्य काम होत असल्याने यासंदर्भात सखोल चौकशी करुन पात्र झोपडपट्टी धारकांना न्याय देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे.
(३) सहकार विभाग, झोपुप्रा, बृहन्मुंबई यांच्या अभिलेखानूसार के.जी.एन सहकारी गृहनिर्माण संस्था या नावाने कोणतीही संस्था नोंदणीकृत असल्याचे दिसून येत नसून प्राधिकरणामध्ये या संस्थेच्या नावाने कोणताही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. तथापि, भारत नगर भागातील झोपडपट्टी ही अंशतः म्हाडाच्या मालकीची व अंशतः एमएमआरडीए च्या मालकीच्या जमीनीवर वसलेली असुन म्हाडा अभिन्यासातील न.भु.क्र ७६४३ वरील एकुण १२ ब्लॉक्स पैकी ब्लॉक्स क्र. ७, ८, ९ व १२ येथील बसेरा संस्थेतील झोपडीधारकांसाठी झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरीता म्हाडा कार्यालयामार्फत दि. १९/०९/१९९६ व १०/१२/१९९६ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकारी म्हाडा मार्फत दि. ०४/०४/२००६ रोजी परिशिष्ट-२ पारीत करण्यात आले. त्यानुसार सदर योजनेस वेळोवेळी आशयपत्र (LOI) देण्यात आले असून योजना प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण, (जि. रत्नागिरी) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर सुरक्षिततेसाठी बांधली जाणारी गॅबियन वॉल घसरत असल्याबाबत

**(४९) * १३४९३ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.रविशेठ पाटील (पेण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि. रत्नागिरी) येथील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर चौपदरीकरणात परशुराम घाटातील धोकादायक दरडी पासून सुरक्षिततेसाठी बांधली जाणारी गॅबियन भिंत (वॉल) घसरत असल्याची बाब दिनांक ५ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घाटातील गॅबियन भिंतीची (वॉलची) उभारणीचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात सुरक्षिततेसाठी बांधली जाणारी गॅबियन भिंतीची (वॉलची) तांत्रिक तपासणी मान्यताप्राप्त संस्थेकडून करून त्याबाबतचा अहवाल तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या दोषीं ठेकेदार, अभियंते आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) हे अंशत: खरे आहे,

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील कि.मी. ०/०० (पळस्पे) ते कि.मी. ८४/०० (इंदापूर) या लांबीतील महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) व कि.मी.८४/०० (इंदापूर) ते ४७१/३० (पात्रादेवी) या लांबीतील महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग विभागामार्फत प्रगतीत आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ या महामार्गावरील परशुराम घाट (ता.चिपळूण) येथील गॅबियन वॉलचे काम राष्ट्रीय महामार्ग (सार्वजनिक बांधकाम) विभागामार्फत प्रगतीत आहे. माहे जून-२०२५ मध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे या गॅबियन वॉलच्या मागील मोऱ्याजवळील मातीचा भराव वाहून गेला होता. याबाबत कंत्राटदारामार्फत खबरदारीत्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे नाही,

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांच्यामार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) यांचेद्वारे मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाट येथील गॅबियन वॉलच्या कामाची देखरेख होत असून कामाचा गुणवत्तात्मक दर्जा राखला जात आहे.

(३) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६ वरील परशुराम घाट (ता.चिपळूण) येथील गॅबियन वॉलचे डिझाइन व रेखाचित्रे यांना आय.आय.टी. संस्थेची मान्यता घेण्यात आली आहे. तसेच सदर डिझाईन व रेखाचित्रे ही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय यांचेमार्फत नियुक्त स्वतंत्र अभियंता (Independent Engineer) यांनी तपासली असून त्यांच्या देखरेखीखाली गॅबियन वॉलचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न केलेल्या इमारतींमधील नागरिकांच्या विविध समस्यांबाबत

**(५०) * ९५०१ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई- विरार महानगरपालिका क्षेत्रात (जि. पालघर) उभारण्यात आलेल्या इमारतींना विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र महानगरपालिकेकडून प्राप्त करून घेतले नसल्याचे माहे मे २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झालेल्या इमारतींना महानगरपालिका तसेच इतर शासकीय प्राधिकरणामार्फत नागरी सुविधा मिळण्याकरिता तसेच महानगरपालिकेकडून अशा इमारतींना शास्तीची घरपट्टी लागत असल्याने रहिवाशांयाना अधिकचा भुर्दंड पडत असून सदरहू इमारती अनधिकृत घोषित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बहुतांश विकासक इमारतींचे बांधकाम नियमानुसार पूर्ण करीत नसल्यामुळे देखील अनेक इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रातील एकाच विकासकाने तसेच त्याच्या अन्य भागीदारी कंपनीं कडून ८९ इमारतीचे बांधकाम पूर्ण करूनसुद्धा भोगवटा प्रमाणपत्र न घेतल्यामुळे अंदाजे ४५ कोटी रुपया अधिक रक्कमेचा महसूल महानगरपालिकेला मिळाला नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेचा बुडालेला महसूल वसूल करण्यासाठी विकासकांनी बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींकरीता भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले नसल्यास संबंधित विकासकावर दंडात्मक कारवाई होण्याकरिता महाराष्ट्र व नगररचना अधिनियम १९६६ मध्ये तरतूद अंर्तभूत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम परवानगी घेतलेल्या विकासकांपैकी काही विकासकांनी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरिता अर्ज केलेला नाही.

(२) खरे आहे.

अवैध बांधकामावर शास्ती आकारण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम २६७-अ मध्ये तरतूद नमुद आहे.

(३) खरे आहे.

(४) खरे आहे.

इमारतीचे वास्तुविशारद यांच्या दि. १८ जून, २०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त माहितीनुसार सदर इमारतीचा अंदाजे ४९ कोटी इतक्या रक्कमेचा महसूल महानगरपालिकेस देय आहे. सदर इमारतींची थकित रक्कम महानगरपालिकेस अप्राप्त असल्याने सदर इमारतींची बांधकाम परवानगी रद्द करण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून नियोजित आहे.

(५) भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या मालमत्तांचा बाह्य यंत्रणेद्वारे जीआयएस सर्व्हे करुन भोगवटा प्रमाणपत्र निर्गमित करणे, प्रलंबित आकार/शुल्क वसूल करणे तसेच सदर मालमत्तांना मालमत्ता कराच्या अधिपत्याखाली आणणे याकामाकरिता दि. ०३ मार्च, २०२५ रोजी निविदा प्रसिद्ध करण्यात आली असून सदर निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून त्यानुषंगाने संबंधितांबरोबर करारनामा करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मिरा भाईंदर (जि.ठाणे ) महानगरपालिकेच्या माजी सहाय्यक आयुक्त यांनी माहितीच्या अधिकारात दिलेले दस्तऐवज बनावट केल्याबाबत

**(५१) * ७४२५ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर (जि.ठाणे ) महानगरपालिकेच्या माजी सहाय्यक आयुक्त श्रीमती कांचन गायकवाड यांना बेकायदेशीर बांधकाम प्रकरणात माहितीच्या अधिकारातील दस्तऐवज बनावट तयार केल्याबद्दल माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान १ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्रीमती कांचन गायकवाड यांनी राज्याचे माहिती आयुक्त यांनाच खोटी कागदपत्रे देऊन दिशाभूल केली असताना व त्यांच्यावर कारवाई झालेली असताना देखील त्यांना पदोन्नती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन महानगरपालिकेच्या माजी सहायक आयुक्त यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) माहिती अधिकारासंदर्भात आयोगाची दिशाभूल केल्या प्रकरणी सदर अधिकाऱ्याला शास्ती झाली होती. तथापि, सदर अधिकाऱ्याविरूध्द पदोन्नतीच्या दिनांकापर्यंत कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित/सुरू नसल्याची खातरजमा करूनच त्यांना दि. २० मार्च, २०२५ रोजी पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(३) राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ यांनी शास्तीसह त्यांच्याविरूध्द प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश महानगरपालिका प्रशासनास दिले होते.

• त्यानुसार महानगरपालिका प्रशासनाने त्यांच्याकडून प्राप्त खुलासा अमान्य करून, त्यांच्यावर दि.१८.०६.२०२५ रोजीच्या आदेशान्वये ठपका ठेवण्यात आला असून, रक्कम रू. २०००/- इतकी शास्ती लादण्याची कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली (जि. ठाणे) महानगरपालिकेच्या प्रसुतीगृहात एका महिलेचा उपचारा दरम्यान झालेला मृत्यू

**(५२) * ७७३१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या शक्तीधाम प्रस्तुतिगृहात गर्भपात आणि कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी श्रीमती शांती देवी मोर्या या महिलेला प्रस्तुतीगृहात दाखल करण्यात आले असता उपचारा दरम्यान सदर महिलेचा दिनांक ४ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा मृत्यू डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे झाला असल्याचे त्यांच्या कुटूंबियाकडून आरोप केला असून याबाबत चौकशी करण्यात यावी अशी मागणी देखील केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन जबाबदार असलेल्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) अशा प्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२६.०३.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये, डॉक्टर / रूग्णालय यांचेकडून उपचारा दरम्यान हलगर्जीपणा झाला किंवा कसे, याबाबत तपास करण्यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

• त्यानुसार कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील शक्तीधाम प्रसूतीगृह, कल्याण (पूर्व) येथील कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी दाखल करण्यात आलेल्या महिलेच्या मृत्युबाबत जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेमार्फत चौकशी सुरू असून, चौकशीअंती संबंधितांवर कारवाई करण्याची तजविज ठेवण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर (जि. लातूर) शहरात जलजन्य आजारांचे रुग्ण वाढत असल्याबाबत

**(५३) * १०२८३ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (जि.लातूर) शहरात गेल्या काही दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असल्याने पोटदुखी, उलट्या आणि जुलाब यांसारख्या जलजन्य आजारांच्या संख्येत वाढ झाली असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून प्राप्त होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर शहरातील कोण कोणत्या भागांमध्ये जलजन्य आजारांचे प्रमाण अधिक आहे व जलजन्य आजाराबाबत आरोग्य विभागास तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे निदर्शनास आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील जलशुद्धीकरण केंद्रांची नियमित तपासणी तसेच पाणीपुरवठा पाईपलाईनची देखभाल व्यवस्थित केली जात नसल्याने नागरिकांना दुषित पाणीपुरवठा होत असल्याच निदर्शनास आले,हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लातूर शहराला शुध्द पाणीपुरवठा होण्याच्यादृष्टिने तसेच जलजन्य आजारांवर नियंत्रण आणण्याकरिता कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

लातूर शहरात दूषित पाणी पुरवठा होत नसून जलजन्य आजारात वाढ झालेली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, धनेगाव धरण क्षेत्र येथे उन्हाळयामध्ये पाण्याची पातळी घटत असल्यामुळे विरघळलेले ऑक्सिजनचे प्रमाण पाण्यात कमी होत असल्याने पाण्यामध्ये शेवाळ निर्मिती प्रक्रिया जलद गतीने होते. त्यामुळे पाण्याला पिवळसर रंग आला आहे. त्यानुषंगाने सदर पाणी नमुने महानगरपालिकेने जिल्हा आरोग्य प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. सदर पाणी पिण्यायोग्य असल्याचे प्रयोगशाळेने महानगरपालिकेस कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

सदरहू प्रश्नाच्या अनुषंगाने लेखी स्वरुपात तक्रारी प्राप्त झाल्या नाहीत असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) लातूर शहर महानगरपालिका यांच्या पाणी पुरवठा विभागाअंतर्गत जलशुध्दीकरण केंद्राची नियमित तपासणी करण्यात येत असल्याबाबत महानगरपालिकेने कळविले असून शहरात सद्यस्थितीत भुयारी गटार योजनेची कामे चालू असल्याने काही ठिकाणी पाईपलाईन लिकेज होते. त्यावरती महानगरपालिकेमार्फत तात्काळ कार्यवाही करुन ते लिकेज काढण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नालासोपारा (जि.पालघर) येथील पाडलेल्या इमारतीतील रहिवाशांचे पुनवर्सनाबाबत

**(५४) * १४०५१ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत येथे बिल्डरांनी बनावट कागदपत्रे तयार करून मलनि:सारण प्रकल्प आणि डंपिंग ग्राऊंडसाठी राखीव असलेल्या जागेवर बेकायेदशीर इमारती उभ्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नालासोपारा येथील ४१ बेकायदा इमारती मा. न्यायालयाच्या आदेशानुसार महानगरपालिकेने निष्कासित केल्यामुळे या इमारतीतील रहिवाशांचे संसार रस्त्यावर आले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा. सर्वोच्च न्यायालयाने या इमारतींना संरक्षण देण्यास नकार देताना, निष्कासन कारवाईमुळे बेघर होणाऱ्या रहिवाशांचे अन्यत्र पुनर्वसन करता येईल काय याची तपासणी करून निर्णय घेण्याचे आदेश प्रशासनाला दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेघर रहिवाशांचे पुनर्वसन करण्याबाबत तसेच दोषी विकासक यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

मा. न्यायालयाच्या दि.०८.०७.२०२४ रोजीच्या आदेशानुसार मौजे आचोळे येथील ४१ अनधिकृत इमारती दि.१७.०२.२०२५ पर्यंत निष्कासित केलेल्या आहेत.
(३) अंशत: खरे आहे,

मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०१.१०.२०२४ रोजीच्या आदेशात अनधिकृत इमारतींवर निष्कासनाची कारवाई करते वेळी बेघर होणाऱ्या रहिवाशांचे अन्यत्र पुनर्वसन करता येईल काय याबाबत शक्यता तपासून पहावी असे नमूद केले आहे.
(४) मौजे आचोळे येथील आरक्षित जागेवर अनधिकृत इमारती बांधकाम प्रकरणी ३९ विकासकांवर एमआरटीपी कायद्या अंतर्गत गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच, अनधिकृत इमारतीवर निष्कासनाची कारवाई केल्यामुळे पुनर्वसन करण्याबाबत महानगरपालिका व शासनाचे याबाबत कोणतेही धोरण नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदलापूर (जि.ठाणे) नगर परिषद हद्दीतील बेलवली येथील पंतप्रधान आवास घरकुल योजनेअंतर्गत आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(५५)** * **१४०१० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बदलापूर (जि.ठाणे) येथील बदलापूर नगर परिषद हद्दीतील बेलवली येथील सर्व्हे क्र.९८,९८-अ व ९९ या शासकीय भूखंडावर पंतप्रधान आवास योजनेअतंर्गत बाधण्यात येत असलेल्या २ हजार २९८ घरांच्या बांधकाम प्रकल्पात कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास उक्त प्रकल्पात नगर परिषदेला केंद्र सरकारकडुन प्रत्येक घरामागे २ लाख ५० हजार रुपये देत असून प्रत्यक्षात नागरिंकाना ८ लाख ७० हजार रुपयास मिळणारे घर कंत्राटदाराच्या विलंबामुळे आता १७ लाख ५० हजार रुपये इतक्या महागड्या दराने घ्यावे लागणार आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पंतप्रधान आवास योजना प्रकल्पाची किंमत २५५ कोटीवरुन ४३४ कोटी रुपयांवर गेल्यामुळे यामध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यातील दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही
(२), (३) व (४) कुळगांव बदलापूर नगरपरिषद कार्यक्षेत्रातील बेलवली येथे प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घटक क्र.१ व घटक क्र.३ नुसार एकूण रक्कम रुपये २५५.९१ कोटी किंमतीच्या प्रकल्पास केंद्रस्तरीय मंजुरी व नियंत्रण समितीची मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार नगरपरिषदेने जाहीर निविदा प्रसिध्द केली असता त्यामध्ये मे.रामलिंगम कंन्स्ट्रक्शन

प्रा.लि.बंगळूर यांची सर्वात कमी किंमतीची निविदा प्राप्त झाल्याने त्यास नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानंतर कंत्राटदारास कार्यादेश देण्यात आला. प्रकल्पाचे काम सुरु करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व मंजूऱ्या तसेच ना-हरकत प्राप्त करुन घेण्यात विलंब झाल्यामुळे, तसेच दरम्यानच्या कालावधीत आलेल्या कोवीड-१९ महामारीमुळे प्रकल्पाचे बांधकाम वेळेवर सुरु होऊ शकले नाही.

निविदा प्रसिध्द केली त्यावेळी कंत्राटदरास जे दर निश्चित करुन देण्यात आले होते त्याचे अंदाजपत्रक २०१७-१८ च्या दरसूची (DSR) नुसार होते. प्रकल्पाचे प्रत्यक्ष बांधकाम सन २०२१ मध्ये सुरु झाल्यानंतर कोवीड-१९ महामारीच्या आलेल्या दोन लाटांमुळे बांधकाम साहित्याच्या दरात झालेली प्रचंड वाढ व कुशल बांधकाम मनुष्यबळाची कमतरता यामुळे प्रकल्पाचे कामाच्या गतीवर परिणाम झाला. महागाई निर्देशांकानुसार बांधकाम साहित्यात झालेली भाववाढ तसेच वाढीव GST ग्राहय धरुन मंजूर प्रकल्पास भाववाढीनुसार सुधारीत मंजूरी देण्याची मागणी कंत्राटदाराने केली. प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये भाववाढीची तरतूद नसल्याने कंत्राटदारास भाववाढ देण्यासाठी प्रस्तावास राज्य व केंद्र शासनाची सुधारीत दराप्रमाणे मंजूरी घेणे आवश्यक असल्याने तसा ठराव नगरपरिषदेने पारित करुन सुधारीत मंजूरी मिळण्याकरीता प्रस्ताव म्हाडा कार्यालयास सादर करण्यात आला असता मंजूर प्रकल्पातील घरकुलांच्या वाढीव किंमतीस राज्यस्तरीय मुल्यमापन समितीने मान्यता देऊन पुढील कार्यवाही करण्याबाबत नगरपरिषदेस कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील पवई तलावाचे प्रदूषण वाढत असल्याबाबत

**(५६) * १२६१० श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील पवई तलावात मोठ्या प्रमाणात सोडण्यात येणारे सांडपाणी, गाळ व जलपर्णीची झालेली वाढ यामुळे जीवाणूंची वाढ होवून पाण्याचा दर्जा खालावल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावात मगर, मासे, पक्षी व इतर जलचर प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असून उक्त बाबींमुळे त्यांचे जीवनमान धोक्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावाच्या पुनरुज्जीवनासाठी राष्ट्रीय तलाव संरक्षण योजनेंतर्गत सन २०२२ मध्ये जलपर्णी काढणे, जलशुध्दीकरण, परिसराचे सौंदर्यीकरण करणे इ. कामे अंतर्भूत असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत नागरिकांनी महानगरपालिकेकडे वारंवार तक्रारी करुनही कारवाई होत नसल्यामुळे सेव्ह पवई लेक या मोहिमेंतर्गत मा.मुख्यमंत्री महोदयांनी या प्रकरणी हस्तपक्षेप करण्याबाबत ई-मेल द्वारे तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर तलावाची साफसफाई करुन पुनरुज्जीवन करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार सन २०२२ मध्ये मुंबई महानगरपालिकेतर्फे जलपर्णी काढण्याचे काम हाती घेण्यात आले होते. तसेच तलावात येणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याबाबतची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे. तलावातील पाण्याचा दर्जा सुधारण्याकरीता व ऑक्सिजनचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यासाठी वायुविजन यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

पवई तलावाच्या गणेश घाट व पवारवाडी या परिसरामध्ये म्हाडा प्राधिकरणातर्फे सुशोभिकरणाचे काम २०२३ साली करण्यात आले आहे.सद्यस्थितीत म्हाडा प्राधिकरणातर्फे संगीताच्या तालावर नाचणारे कारंजे बसविण्याचे काम प्रस्तावित आहे.

(४) हे खरे आहे.

(५) मुंबई महानगरपालिकेतील जल अभियंता या विभागामार्फत जलपर्णी काढण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.

पवई तलावातील गाळाचे सर्वेक्षण मेरी, नाशिक या संस्थेमार्फत पूर्ण करण्यात आलेले आहे. जैवविविधतेचा समतोल विचारात घेवून तलावाच्या पृष्ठभागावर वाढलेले जलपर्णी तलावातून बाहेर काढून विल्हेवाट लावण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर करण्यात येत आहे.

सांडपाणी वळविण्यासाठी मल:निसारण वाहिनी व सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प या करिता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरुर तालुक्यात (जि.बीड) येथे विविध विकास कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

**(५७) * ११३४४ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड क्षेत्रामध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २ यांनी शिरूर (का) तालुक्यामध्ये सन २०१९ ते २०२५ या कालावधीमध्ये शासनाच्या विविध लेखाशीर्ष अंतर्गत लहान-मोठी विविध विकास कामे केलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामामध्ये कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांनी अनियमितता करीत निकृष्ट दर्जाची कामे करुन मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या वतीने सर्व लेखाशीर्ष अंतर्गत निधी व कामे मंजूर झालेले असताना देखील कामे न करताच मोजमाप पुस्तिका लिखित करून त्याद्वारे देयके उचलण्यात आलेले असून यामध्ये बहुतांश बांधकाम विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतःच कंत्राटदार या नात्याने काम केल्याच्या देखील तक्रारी प्राप्त आह, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बीड मध्ये झालेल्या कामांमध्ये निकृष्ट दर्जा व भ्रष्टाचाराबाबत सन २०१९ ते २०२५ या कालावधी मधील कामानिहाय, लेखाशीर्षनिहाय, देयकेनिहाय तसेच जी देयके ऑनलाइन सॉफ्टवेअर कंपनीला देण्यात आलेली आहेत त्याची देखील चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर, अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ,धाराशिव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) निवेदन प्राप्त आहे.

(५) निवेदनाच्या अनुषंगाने त्रयस्थ कार्यकारी अभियंता यांचे तपासणी पथक नेमले आहे. पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अहवातील निष्कर्ष संबंधित अधिक्षक अभियंता यांचे अभिप्रायासह प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## शिवाजी नगर बस डेपो मानखुर्द (मुंबई) येथील लगत शासनाचा मोठा मोकळा भूखंड समाजाच्या हितासाठी उपयोगात आणण्याबाबत

**(५८) * ९३२३ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील शिवाजीनगर बस डेपो लगतचा शासनाचा मोकळया भूखंडावर मोठया प्रमाणात कचरा टाकण्यात येत असल्यामुळे दुसरे डंम्पिंग ग्राउंड तयार होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कचऱ्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाने विभागातील नागरीकांना मोठया दुर्धर प्रामाणात आजारांना सामोरे जावे लागत असल्याने याबाबतची दखल घेवून सदर भूखंड हा समाजहितासाठी उपयोगात आणून या ठिकाणी खेळाचे मैदान किंवा उद्यान बनविण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतीनिधी व नागरीकांमार्फत करण्यात येत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

मानखुर्द येथील शिवाजीनगर बेस्ट डेपो च्या लागतचा भूखंड हा बेस्ट उपक्रमाच्या मालकीचा असून सदर अनधिकृतपणे डंपिग होत असल्याचे निर्दशनास आल्यानुसार सदरचा भूखंडाचा अनधिकृत वापर होऊ नये यासाठी बेस्ट उपक्रमाने सदर भूखंडास संरक्षण भिंतीचे पुर्नबांधकाम केले आहे.

(२) सदर भूखंडावर खेळाचे मैदाने किंवा उद्यान बनविण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधीद्वारे करण्यात येते हे खरे आहे. मात्र सदर भूखंड बेस्ट उपक्रमाच्या मालकीचा व ताब्यात आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई तालुक्यात (जि.पालघर) ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याबाबत

**(५९)** * **७२६४ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात कामण परिसरात , देवदल, कोल्ही व चिंचोटी या परिसरात वसई विरार महानगरपालिकेची कोणतीही पाणीपुरवठा योजना कार्यान्वित नसल्याने ग्रामस्थांना पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात नदीलगतच्या बेलकडी, टेपाचा पाडा येथील आदिवासी बांधवानांही दरवर्षीप्रमाणे मार्च अखेरीस पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असून नदीपात्रात तात्पुरता खडडा खोदून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी लागत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार या परिसरातील स्थानिकांची पिण्याच्या पाण्याची टंचाई लवकरात लवकर दूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही,

(२) अंशत: खरे आहे.

बेलकडी, टेपाचा पाडा भागासह कामण, कोल्हा, चिंचोटी, देवदळ इत्यादी भाग हा भौगोलिकदृष्टया समुद्र सपाटीपासून १५ ते २० मीटर उंचीवर असल्याने उन्हाळयात भूजलाची पातळी खाली गेल्याने पाणी टंचाई निर्माण होते.

बेलकडी, टेपाचापाडा भागासह कामण, कोल्हा, चिंचोटी, देवदळ इत्यादी भागात पाणीटंचाई काळात महापालिकेमार्फत टँकरव्दारे शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येतो.

नदीपात्रात तात्पुरता खड्डा खोदून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येत असल्याची बाब महापालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.

(३) पालघर जिल्ह्यातील वसई तालुक्यातील कामण, देवदळ, कोल्ही व चिंचोली ही गावे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या “६९ गावांची पाणी पुरवठा योजना” यात समाविष्ट आहेत.

सदर पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट असलेल्या ६९ गावांपैकी ५२ गावे महानगरपालिकेत समाविष्ट आहेत. सदर ५२ गावांमध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या PVC जल वितरण वाहिन्या ह्या नादुरुस्त असल्याने या जल वितरण वाहिन्यांऐवजी DI वितरण जल वाहिन्या अंथरण्याच्या कामांचा समावेश हा अमृत २.० या मध्ये करण्यात आला आहे.

सदर योजना ही माहे डिसेंबर, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेने मिळकतकर थकविल्याच्या कारणावरून सिंहगड इन्स्टिट्यूटच्या मिळकती जप्त केल्याबाबत

**(६०) * ७५७० श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेने मिळकतकर थकविल्याच्या कारणावरून सिंहगड इन्स्टिट्यूटच्या एरंडवणे, वडगाव बुद्रुक आणि कोंढवा बुद्रुक येथील एकूण ४९ मिळकती जप्त केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सिंहगड इन्स्टिट्यूटच्या विविध मिळकतींवर एकूण ३४५ कोटी रुपयांहून अधिक थकीत मिळकतकर प्रलंबित असून, महानगरपालिकेने यापूर्वीही माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान संस्थेचे मुख्य कार्यालय जप्त केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महानगरपालिकेने संबंधित संस्थेला थकबाकी भरण्यासाठी वेळोवेळी नोटिसा बजावल्या असूनही ती दुर्लक्षित केल्याचे कारण सांगत जप्तीची कारवाई करण्यात आली असल्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. ही ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत संबंधित संस्थेने महानगरपालिकेला काय उत्तर दिलेले आहे तसेच महापालिकेने जप्त केलेल्या मिळकतींची लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात आली असल्यास ती कोणत्या टप्प्यावर आहे,
(५) असल्यास,पुणे शहरातील अन्य शैक्षणिक संस्था किंवा खासगी ट्रस्ट यांच्या मिळकतकर थकबाकी संदर्भात अशा प्रकारे जप्ती/दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे काय,
(६) असल्यास, सदर प्रकरणात संबंधित संस्थेकडून सातत्याने महानगरपालिकेच्या कर आकारणीला न जुमानता नियमभंग केल्याबद्दल शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :**(१) अंशत: खरे आहे.
शैक्षणिक संस्था असल्या कारणाने विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून वर्ग खोल्या जप्त न करता केवळ ऑफिस जप्त केले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर संस्थेने मालमत्ता कराचा भरणा करणेबाबत नियमाप्रमाणे देय असलेला मालमत्ता कराचा तपशिल मागविला होता. तद्नंतर सदर संस्थेस नियमाप्रमाणे देय असलेला मालमत्ता कराचा तपशिल देण्यात आला आहे.
(४) मिळकतीच्या मालमत्ता पत्रकावर बोजा चढवण्याची कार्यवाही सूरु आहे. तद्नंतर लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे.
(५) पुणे शहरातील काही शैक्षणिक संस्था नियमित कराचा भरणा करित आहेत. तसेच काही शैक्षणिक संस्था व खाजगी ट्रस्ट यांनी नोटीस बजावल्यानंतर कर भरला आहे.
(६) संबंधित संस्थेची मालमत्ता जप्त करण्यात आली असून मालमत्ता पत्रकावर बोजा चढविण्याची कार्यवाही सुरु आहे. तद्नंतर लिलाव प्रक्रिया करण्यात येणार आहे.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(६१) * ११८०७ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सफाई कामगारांच्या नियुक्त्यांबाबत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार शासनाने दिनांक.२८ जानेवारी, २०२५ रोजी परिपत्रक काढूनही ठाणे महानगरपालिकेतील सुमारे ८०० वारसा हक्काचे उमेदवार नियुक्तीपासून वंचित राहिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक.२४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने नियोक्ता, नियुक्ती प्राधिकारी, प्रशासनाचे सक्षम अधिकारी यांची नियुक्ती करणे आणि पात्र अर्जदारांच्या कागदपत्रांची छाननी करण्याचे दिनांक ८ जानेवारी, २०२५ रोजीच्या सुमारास निर्देश दिले असूनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र वारसांना तातडीने नियुक्ती देणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१)अंशत: खरे आहे.
दि.२८ जानेवारी २०२५ नंतर १३५ वारसांना महापालिकेच्या सेवेत नियुक्ती दिली आहे. तसेच सफाई कामगारांच्या वारसाच्या कागदपत्रांची तपासणी करून नियुक्ती देणेबाबत ठाणे महानगरपालिका स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.
(२) खरे नाही.
(३)प्रश्न उद्‌भवत नाही.
(४)प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### पुणे महानगरपालिकेच्या वडगाव शेरी उपक्षेत्रीय कार्यालयात मालमत्ता कर कमी करण्यासाठी नागरिकांकडून शुल्क आकारात असल्याबाबत

**(६२) * ८०८७ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या वडगाव शेरी उप क्षेत्रीय कार्यालयात नागरिकांच्या वाढीव बांधकामाला मालमत्ता कर कमी करण्यासाठी नागरिकांकडून पैसे घेऊन त्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मागील वर्षाचा टॅक्स प्रलंबित राहिल्यास अधिकची रक्कम द्यावी लागेल, जागेवर येऊन मालमत्ता मोजावी लागेल, स्थळ पाहणी अहवाल बनवावा लागेल या सगळयांना काही महिने लागतील अशी भीती दाखवून नागरिकांकडून अनधिकृतरित्या पैसे मागितले जातात आणि पैसे न दिल्यास हेतू पुरस्सर जास्त टॅक्स लावला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### वसई – विरार परिक्षेत्रात (जि.पालघर) पावसाळयात निर्माण होणाऱ्या पूरस्थितीबाबत

**(६३) * ९६९० श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाण्यातील कळवा खाडीचे पात्र अरुंद झाल्याने ठाणे, कल्याण, डोंबिवली आदी शहरातील पावसाळ्यातील पाणी वसई खाडीत येत असल्याने पाण्याचा निचरा होण्याचा वेग मंदावून वसई – विरार शहरात पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात नैसर्गिक नाल्यावर करण्यात आलेले अतिक्रमण, बेकायदा माती भराव व नियोजन शून्य पद्धतीने बांधण्यात आलेली बांधकामे यामुळे देखील शहरात गत काही वर्षांपासून पूरस्थिती निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसई क्षेत्रामध्ये येणाऱ्या खाडीतील मौजे जुचंद्र व मौजे मालोंडे येथील अंदाजे ११,५५,६४० ब्रास (३२,७०,४४६ घनमीटर) एवढे Silt Dredging न केल्यामुळे समुद्राकडील भाग उंच राहत असल्याने पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसई – विरार महानगरपालिका क्षेत्रात पावसाळ्यात होणारी पूरस्थिती रोखण्यासाठी कळवा खाडीची रुंदी वाढवून, शहरातील नैसर्गिक नाल्यांवर होत असलेली अनधिकृत बांधकामे हटवून, जुचंद्र व मौजे मालोंडे येथील खाडीतील गाळ (Silt Dredging) काढण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही,

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील कळवा खाडीचे पात्र अरूंद नाही.

(२) खरे नाही,

वेळोवेळी नैसर्गिक नाल्यावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येतात.

(३) खरे नाही,

(४) वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत माहे एप्रिल, २०२५ पासून पावळयापूर्वी मौजे जूचंद्र येथील १९०० मीटर लांबीच्या नाल्यातून १२४६ घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. तसेच मौजे मालोंडे येथील २००० मीटर लांबीच्या नाल्यातून २३७८ घनमीटर गाळ काढण्यात आलेला आहे. तसेच शहरातील नैसर्गिक नाले व खाडीचे नाल्यातील गाळ काढण्याचे काम करण्यात आले आहे. अद्यापपर्यंत शहरातील १७१ किमी नालेसफाई करण्यात आलेली असून ६८,८९५ घन मीटर गाळ काढण्यात आलेला असून सद्यस्थितीत काही भागात गाळ काढण्याचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे, वेळोवेळी नैसर्गिक नाल्यावरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात गैरव्यवहार झाला असल्याबाबत

**(६४) * १४०५२ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापन संबंधित विभागात २४ कोटी ६४ लाख रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भारतीय लेखापरीक्षण आणि लेखा विभागाचे मा. लेखापाल (ऑडिट १) महाराष्ट्र यांच्याकडील परीक्षण अहवालात उक्त प्रकल्पाचा कोणताही उपयोग न होता २४ कोटी ६४ लाख खर्च केल्या गेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्प अपयशी ठरल्यामुळे हरित लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ यांच्याद्वारे वसई-विरार शहर महानगरपालिकेला नोटीस बजावली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकल्पाचे आयआयटी पवई, मुंबई यांच्या माध्यमातून त्रिसदस्य संस्था परीक्षण झाले असून त्याच्या अहवाल (ऑडिट रिपोर्ट) माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) उक्त प्रकरणी तीनही अहवालाच्या नुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) खरे नाही.

Sanitary Landfill Site (SLF) या प्रकल्पासाठी रु. २४.६४ कोटीचा खर्च झाला असून, सदर प्रकल्पाचा वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत वापर करण्यात आलेला आहे.
(२) अंशत: खरे आहे.

लेखापाल (ऑडिट १) महाराष्ट्र यांच्या लेखा परीक्षण अहवालात सदरची बाब नमूद आहे. तथापि, Sanitary Landfill Site (SLF) साठीचा वापर सुरु झाल्यामुळे त्याकामी खर्च झालेला रु. २४.६४ कोटीचा खर्च उपयोगात आलेला आहे.
(३) खरे नाही.

तथापि, मा. राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांच्या अंतरिम आदेशानुसार पर्यावरणीय भरपाईसाठी महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) कडे रक्कम जमा करण्याबाबत निर्देशित करण्यात आले होते. परंतु, सदर निर्देशास मा. सर्वोच्च न्यायालयाकडून अंतरिम स्थगिती देण्यात आलेली असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) हे खरे आहे,

आय.आय.टी, पवई, मुंबई यांनी त्यांच्या अहवालात Sanitary Landfill Site (SLF) च्या कामाबाबत समाधान व्यक्त केले आहे. तसेच दीर्घकालीन आराखड्यासाठी सूचना केलेल्या असून, त्यानुषंगाने महानगरपालिका कार्यवाही करत आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मानखुर्द क्षेत्रातील आर.एस.डी.एफ. संकल्प वसाहत (ट्रान्झिस्ट कॅम्प ) येथील कुटूंबाचे एमएमआरडीए कडून पुनर्वसन करण्याबाबत

**(६५) * ९३३० श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मानखुर्द शिवाजीनगर क्षेत्रामधील आर.एस.डी.एफ. संकल्प वसाहत (ट्रान्झिस्ट कॅम्प) येथील ४२८ कुटूंबाचे पुनर्वसन करण्यात आले व बाकी उर्वीरित ३१ कुटूंबाचे अद्याप पर्यंत एमएमआरडीए यांच्याकडून पुनर्वसन बाकी असून बृहमुंबई महानगरपालिका यांच्याकडूनही ५३ कुटूंबाचे पुनर्वसन करणे बाकी असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कुटुंबियांचे लवकरच पुनर्वसन करण्यात यावे याकरिता स्पार्क या संस्थेने दिनांक १२ ऑगस्ट,२०२४ रोजी एमएमआरडीए व महानगरपालिकेस लेखी पत्र दिले असून या पत्रास अनुसरून लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ ऑगस्ट,२०२४ रोजी शिफारस पत्र दिले तथापि त्यांना याबाबत काहीच कळविले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर ट्रान्झिस्ट कॅम्प मधील पुनर्वसन केलेल्या जागेवर तेथिल भूमाफियांनी मोठया प्रमाणात कब्जा करून त्या जागा लाखो रूपयांमध्ये विक्री केल्या असून सदर जागेवर अतिक्रमण करून मोठे व्यावसायिक गाळे व घरे बांधून विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत अतिक्रमण काढण्यासाठी भुमाफिया यांच्या विरोधात कोणती कारवाई करण्यासह कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) व (२) स्पार्क' या अशासकीय संस्थेमार्फत मानखुर्द शिवाजी नगर क्षेत्रामधील आर. एस. डी. एफ. संकल्प वसाहत, न. भू. क्र. १३८बी, ट्रान्झिस्ट कॅम्प, मानखुर्द, मुंबई येथील ४६५ झोपडीधारकांचे कायमचे पुनर्वसन करण्याबाबतचा प्रस्ताव सन २०१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाला होता. त्यापैकी ४३४ झोपडीधारकांचे अंतिम परिशिष्ट-२ मंजूर करुन तयार करण्यात आले. अंतिम परिशिष्ट -२ नुसार ४२२ पात्र झोपडीधारकांचे बृहन्मुंबई महागनगपालिकेमार्फत नटवर पारेख कंम्पाऊंड येथे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आले आहे. अंतिम परिशिष्ट-२ मधील उर्वरित १२ अपात्र झोपडीधारकांनी आवश्यक पुरावे सादर केले नसल्याने ते अपात्र ठरले आहेत. तसेच ५३ झोपडीधारकांची नावे ही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत केलेल्या अंतिम परिशिष्ट-२ मध्ये तसेच २०१७ मध्ये 'स्पार्क' (NGO) संस्थेमार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये समाविष्ट नसल्याने त्याच्या पुनर्वसनाचा प्रश्न उदभवत नाही.
तसेच प्रश्नाधिन ३१ कुटूंबे ही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेतलेल्या सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता रुंदिकरणामध्ये बाधित असल्याचा दावा करीत आहेत. त्यांचे प्रकरणी प्राधिकरणामध्ये कार्यालयीन अभिलेख तपासणी करुन त्यापैकी १८ कुटूंबियांची नावे सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता रुंदिकरण प्रकल्पाच्या पायाभूत सामाजिक व आर्थिक सर्वेक्षण अहवालात (BSES) दिसून येत नसल्यामुळे त्यांचे पुनर्वसन करणे शक्य नाही. त्याप्रमाणे संबंधितांना कळविण्यात आले आहे. त्याचबरोबर ०७ कुटूंबियांना तक्रार निवारण समितीने अपात्र घोषित केले आहे. उर्वरीत ०६ कुटूंबियांनी तक्रार निवारण समितीकडे दावा दाखल केला असल्याचे संबंधितांना प्राधिकरणास कागदपत्रे सादर करणेबाबत संबंधित कुटूंबियांना प्राधिकरणामार्फत कळविण्यात आले आहे. त्यांचा कोणताही प्रतिसाद प्राधिकरणास मिळालेला नाही. सदरहू ३१ झोपडीधारकांच्या पुनर्वसनाबाबतची वस्तुस्थिती सन्माननीय लोकप्रतिनिधी यांना प्राधिकरणाच्या दिनांक २६.०३.२०२५ व ०३.०६.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आली आहे.
(३), (४) व (५) सदर संक्रमण शिबीरामध्ये निष्कासन करण्यात आलेल्या मोकळया जागेवर तसेच रिकाम्या रिक्त सदनिकांमध्ये अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदरहू अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत पोलिस बंदोबस्त घेऊन मुंबई विकास महानगर प्रदेश प्राधिकरण, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर, बृहन्मुंबई महानगरपालिका व उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) चेंबूर यांच्या समन्वयाने निष्कासनाची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.